आधुनिक केसरी

मंगळवार, १५ नोव्हेंबर २०२२
⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -९५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 15 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-95 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# सक्तीचे धर्मांतर गंभीर मुद्दा

## सर्वोच्च न्यायालयाचे केंद्र सरकारला भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने सक्तीचे धर्मांतर हा गंभीर मुद्दा असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. या मुद्द्यावर भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत. या समस्येवर केलेल्या उपाययोजनांबाबत आठवड्याभराच्या आत माहिती देण्यासही केंद्र सरकारला सांगण्यात आले आहे.**



देशात सक्तीचे धर्मांतर होत असेल, तर हा खरंच गंभीर मुद्दा आहे. याचा परिणाम देशाच्या सुरक्षेसह नागरिकांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर होऊ शकतो, असे न्यायमूर्ती एनआर शाह आणि हिमा कोहली यांच्या खंडपीठाने म्हटले आहे. सक्तीचे धर्मांतर रोखण्यासाठी केंद्राने प्रामाणिक प्रयत्न करायला हवेत. अन्यथा देशात गंभीर स्थिती निर्माण होऊ शकते. या प्रकरणात केंद्राने लक्ष घालणे गरजेचे असून न्यायालयाने काय कृती करावी हे केंद्राने सुचवले पाहिजे", असे न्यायमूर्तींच्या खंडपीठाने म्हटले आहे. देशातील सक्तीच्या धर्मांतराच्या मुद्द्यावरुन दिल्लीतील भाजपा नेते अश्विनी कुमार उपाध्याय यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवरील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने हे महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले आहे. या याचिकेवर पुढील सुनावणी २८ नोव्हेंबरला होणार आहे.

### चर्चेतील बातमी


## ओवैसींच्या सभेत मोदी-मोदीच्या घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**सुरत :** गुजरातमधील विधानसभा निवडणूक दोन टप्प्यांत होणार असून येत्या १ आणि ५ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. दरम्यान, निवडणूक जवळ आल्यामुळे येथे प्रचार शिगेला पोहोचला आहे. या निवडणुकीत काँग्रेस, आम आदमी पार्टी अर्थात आप पक्ष पूर्ण ताकद लावत आहे. तर दुसरीकडे एमआयएमदेखील येथे जवळपास ३० जागांवर निवडणूक लढवणार आहे. दरम्यान, एमआयएमचे सर्वोसर्वा असदुद्दीन ओवैसी यांना येथे काही ठिकाणी विरोध होताना दिसत आहे. त्यांच्या सुरतमधील एका सभेत श्रोत्यांनी 'मोदी-मोदी'च्या घोषणा दिल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार ओवैसी गुजरातमधील सुरत येथई रुद्रपुरा भागात एका सभेला संबोधित करण्यासाठी आले होते. मात्र येथे त्यांना काळे झेंडे दाखवण्यात आले. तसेच ओवैसी यांच्या स्वागतावेळी सभेमध्ये मोदी-मोदीच्या घोषणा देण्यात आल्या. ओवैसींच्या सभेमध्ये श्रोत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा जयजयकार केल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या घटनेचा व्हिडीओ सध्या समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. दरम्यान, गुजरामध्ये ओवैसी यांचा पक्ष साधारण ३० जागा लढवणार आहे. आप पक्षानेदेखील सर्व जागांवर आपले उमेदवार उभे केले आहेत. याच कारणामुळे भाजपाला ही निवडणूक पूर्ण ताकदीने लढवावी लागत आहे.

## 'ब्लू टिक'साठी पैसे भरावेच लागणार?

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** बनावट खात्यांकडून गैरवापर झाल्यानंतर ट्विटरने गेल्याच आठवड्यात लॉन्च केलेली आठ डॉलर्स सबस्क्रिप्शनची 'ब्लू टिक' सेवा शुक्रवारी स्थगित केली आहे. ही सेवा पुन्हा कधी सुरू होणार याबाबत प्रश्न विचारले जात असतानाच ट्विटरचे मालक एलॉन मस्क यांनी एक ट्वीट केले आहे. 'ट्विटर ब्लू' सेवा पुढील आठवड्याच्या अखेरपर्यंत कदाचित पुन्हा सुरु होईल, अशी माहिती मस्क यांनी दिली आहे. ट्विटरकडून 'ब्लू टिक' पूर्वी राजकारणी, पत्रकार, प्रसिद्ध व्यक्तींच्या व्हेरिफाईड खात्यांना दिली जात होती. मात्र, आता यासाठी सबस्क्रिप्शन सेवा सुरू केल्यानंतर ही टिक कोणालाही वापरता येणे सहज शक्य आहे. त्यामुळे गैरप्रकार वाढल्याने ही सेवा स्थगित करण्याची नामुष्की ट्विटरवर ओढवली. दरम्यान, या प्रकारानंतर कंपनीने हाय प्रोफाईल खात्यांसाठी नव्याने अधिकृत बॅजेस तयार केले आहेत. कंपनीच्या अंतर्गत मंजूर यादीनुसार व्यवसाय आणि माध्यमांशी संबंधित खात्यांवर 'ग्रे बॅज' दिसून येत आहे. 'ट्विटर ब्लू' सेवा स्थगित करण्याआधी कंपनीने महत्त्वाच्या खात्यांसाठी हा बॅज तयार केला आहे.

# अशाने जनतेचा कायद्यावरील विश्वास उडेल

## पोलिसांचा गैरवापर सुरू : राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** मुख्यमंत्र्यांसमवेत त्या महिलेचे फोटो दिसत आहेत.



एकंदरीतच त्यानंतर त्या महिलेने रात्री उशिरा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकाराचा निषेध करावा तितका कमीच आहे. पोलिसांचा गैरवापर सुरू आहे आणि पोलीसदेखील एखादया प्याद्याप्रमाणे काम करत असतील तर महाराष्ट्रातील जनतेचा कायदा व सुव्यवस्थेवरील विश्वास उडल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे सरकारच्या पोलिसांनी घेतलेल्या कृतीचा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत निषेध केला. आव्हाड यांच्यावर विनयभंगाचा खोटा गुन्हा दाखल केल्यानंतर आज जयंत पाटील यांनी ठाण्यात आव्हाड यांची भेट घेत पत्रकार परिषदेत सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. आव्हाड यांच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे ही गंभीर बाब आहे. आव्हाड यांनी विधानसभा अध्यक्षांना देणारा राजीनामा कळवला आहे. त्यामुळे इथे येऊन त्यांची समजूत घालण्यासाठी आलो असल्याचे जयंत पाटील यांनी स्पष्ट केले. प्रवासात असताना त्यांच्याबाबतीत असलेली क्लीप पाहिली. याशिवाय काही माहिती लोकांनी दिली. एका कार्यक्रमात त्या महिलेला भगिनी म्हणून आव्हाड संबोधतात, त्यावरून आव्हाड यांची भावना कळेल आणि या व्हिडीओमध्ये तीच महिला आहे. त्याच भगिनी गर्दीत मुख्यमंत्र्यांच्या गाडीच्या जवळ येण्याचा प्रयत्न करतात त्यावेळी इथले स्थानिक खासदार हे आधी आव्हाड यांच्यासमोर येतात त्यांना पाठीमागे जाण्यासाठी जागा करून देतात. त्याचवेळी त्या महिलेला 'गर्दीत कशाला आहात बाजूला थांबा' असे हात लावून सांगतात. त्या व्हिडीओत त्यापेक्षा वेगळी कृती नाही तरीदेखील त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी जयंत पाटील यांनी विनयभंगाचा गुन्हा कशापद्धतीने असतो याबाबत माहिती दिली. त्यानंतर त्यांनी राज्यसरकारसह पोलिसांना काल झालेली घटना या व्याख्येत कुठे बसते असा प्रश्न केला. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गर्दी झाल्यावर माणसांना बाजूला करण्याच्या प्रयत्नात प्रत्येकाला धक्काबुक्की होत असते मग त्यामध्ये स्त्री असो पुरुष असो. महाराष्ट्र पोलीस किंवा ठाण्याच्या पोलीसांनी हा प्रकार ३५४ कलमामध्ये बसवला. जर एखाद्याला गुन्हेगार ठरवण्याचे काम जाणीवपूर्वक होत असेल महाराष्ट्रात कायदा आणि सुरक्षा याबाबतीत गृहविभागाने आपला पोलीस विभाग काय काम करत आहे याकडे बघण्याची गरज आहे असा टोलाही जयंत पाटील यांनी लगावला.

### हा षडयंत्राचा भाग : जितेंद्र आव्हाड

माझ्यावर कुठलाही गुन्हा नोंदवला असता तरी चालले असते परंतु ३५४ हा गुन्हा मला मान्य नाही . आणि जो मी आयुष्यात केला नाही . पोलिसांनी हा गुन्हा कसा काय दाखल केला . तक्रारीत शब्द वापरले आहेत ते त्यापेक्षा व्हिडीओ क्लीअर आहे कोणते शब्द वापरले आहेत ते . समाजात माझी मान खाली जाईल अशापध्दतीचा गुन्हा नोंदवायचा हा षडयंत्राचा भाग झाला . आहे त्यामुळे राजकारण करावं मी मंत्री असताना माझ्या वागण्याची पद्धत सगळ्यांना माहित होती . सरकार सगळ्यांचे असते आमदारांमध्ये भेदभाव केला नाही . मला असेच पोलीस ठाण्यात नोटीस देत आहे म्हणून बोलावले . थोड्यावेळाने डीसीपी आले त्यांच्याशी गप्पा मारल्या आणि मी मुंबईत जातोय म्हटल्यावर तुम्हाला अटक करण्यात येत आहे असे सांगण्यात आले . ४१ अन्वये नोटीस दिल्यानंतर ७२ तास त्या व्यक्तीला द्यावे लागतात . त्या नोटीसमध्ये पाच वाजता चौकशीला हजर रहा सांगत आहेत . इंग्रजाच्या काळातील कलम लावून उपजीविकेच्या साधनात अडचण केली म्हणून मला अटक करण्यात आली . आम्ही माफी मागणार नाही . आम्ही लढलो शिवाजी महाराजांसाठी आणि लढत राहू त्यामुळे जेलमध्ये राहणे हे नवीन नाही . जेम्स लेन आला तिथपासून लढत आहे . आणि ही लढाई अविरत चालू राहील . पण पोलिसी बळाचा वापर कशासाठी त्याबद्दल मला जास्त बोलायचे नाही .

# जनहित याचिकांच्या कार्यवाहीचे थेट प्रक्षेपण व रेकॉर्डिंग करा

## जालना येथील संस्थेची दिवाणी अर्जाद्वारे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

जालना : मुंबई उच्च न्यायालय व त्यांच्या खंडपीठांमध्ये 'संवैधानिकदृष्ट्या महत्त्वाच्या व समाजातील मोठ्या समूहावर प्रभाव टाकणाऱ्या जनहित याचिकांच्या सुनावणीचे थेट प्रक्षेपण (लाइव्ह स्ट्रीमिंग) व ऑडियो-व्हिडिओ रेकार्डिंग करावे यासह इतर मागण्यांसाठी जालना येथील अशासकीय संस्था व संभाजी ब्रिगेड, जालना यांनी जनहित याचिकेमध्ये दीवाणी अर्ज दाखल केला आहे. हा अर्ज व जनहित याचिकेची सुनावणी मंगळवार, 15 नोव्हेंबर 2022 रोजी होणार आहे.

पीपल्स राइट्स व्हिजिलन्स ऑर्गनायझेशन, जालना या संस्थेचे महासचिव राकेश अग्रवाल यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका क्रमांक 89 /2021 मध्ये दीवाणी अर्ज दाखल केला असून त्यात म्हटले आहे की, जनतेवर किंवा मोठ्या लोकसंख्येवर परिणाम करणाऱ्या याचिकांच्या न्यायालयीन कार्यवाहीचे लाइव्ह स्ट्रीमिंग व ऑडिओ-व्हिडिओ रेकार्डिंग देशातील इतर उच्च न्यायालयांमध्ये सध्या होत आहे. ते महाराष्ट्रातही सुरू करण्याचे आदेश द्यावे.भारतीय संविधान व निष्पक्ष न्यायाच्या उन्नतीसाठी हे आवश्यक आहे.

जनहित याचिकेमधील प्रमुख मागण्या...

1. मध्यमवर्गियांना परवडणाऱ्या दरात न्याय मिळावा महाराष्ट्रातील मध्यमवर्गियांना परवडणाऱ्या दरात न्याय मिळावा म्हणून 'मध्यम आयवर्गीय विधी साहाय्य योजना' लागू करावी. अशी योजना सध्या सर्वोच्च न्यायालय व इतर राज्यांमधील हायकोर्टांमध्ये लागू आहे. मग ती महाराष्ट्रातही का असू नये? या योजनेला भारतीय संविधान 1950चे कलम 39 अ आणि विधिसेवा प्राधिकरण कायदा 1987च्या कलम 29 व 29 अ यांचा आधार आहे.


2. राजभाषा मराठीस न्यायालयात योग्य वागणूक मिळावी : महाराष्ट्राची राजभाषा मराठीत केलेली याचिका उच्च न्यायालयाने स्वीकारावी. तसेच



आर्थिक किंवा अन्य असमर्थतेमुळे वकील न लावू शकणारा याचिकाकर्ता स्वतः पार्टी इन परसन (party in person) यांनी महाराष्ट्राची राजभाषा मराठीत केलेली याचिका उच्च न्यायालयाने स्वीकारावी आणि त्यांना समान वागणूक मिळावी किंवा पार्टी इन परसन याचिकाकर्त्याने दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणीसाठी वेगळी व्यवस्था किंवा त्याबाबत उपयुक्त नियम बनवण्याचे आदेश देण्यात यावे. भारतीय संविधानाच्या तरतुदीनुसार व महाराष्ट्र राज्यातील उच्च न्यायालयांनी बनवलेल्या नियमांना अनुसरूनच ही मागणी केलेली आहे. 3. 'पार्टी इन पर्सन'ला सुलभ प्रवेश मिळावाः राज्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या (पार्टी इन पर्सन) उच्च न्यायालयात प्रवेशावर नियंत्रण आणि अडथळे निर्माण करणारी व न्याय मिळवण्यापासून सर्वसामान्य नागरिकांना (पार्टी इन पर्सन) वंचित करणाऱ्या अधिसूचना क्रमांक P.1602/2015 आणि G/Amend/654/2015, dated 09.09.2015 या रद्द करण्यात याव्यात. आणि प्रत्येक सर्वसामान्य नागरिकास (पार्टी इन पर्सन) महाराष्ट्र राज्याच्या उच्च न्यायालयात सुलभ प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी आदेश देण्यात यावे.

4. रिट (writ) जारी करण्याचे अधिकार जिल्हास्तरावर द्यावेतः राज्यातल्या प्रत्येक नागरिकाची 'न्यायापर्यंत सुगम पोहोच' (Easy Access to Justice), 'उच्च न्यायालयात वाढत्या प्रलंबित याचिकांचा लवकर निपटारा व्हावा' यासह 'नागरिकांना जलद आणि परवडणाऱ्या दरात न्याय मिळावा म्हणून रिट (writ) जारी करण्याचे अधिकार फक्त सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयापुरते मर्यादित न ठेवता भारतीय संविधानाचे कलम 32 (3) मधील तरतुदीनुसार राज्यातील जिल्हा न्यायालयांनाही मर्यादित क्षेत्रापुरते मर्यादित रिट जारी करण्याचे अधिकार द्यावेत किंवा राज्यात जिल्हास्तरावर काही रिट न्यायालयांची स्थापना करावी. असे केल्यास जिल्हा प्रशासकीय अधिकारी (आयएएस किंवा आयपीएस) यांच्या विरुद्धच्या लहान-सहान किरकोळ न्यायिक किंवा प्रशासनिक तक्रारींचे निवारण जिल्हा न्यायिक अधिकारीच (PDJ) करू शकतील. त्यामुळे राज्यातला 'एक सर्वसामान्य नागरिक' त्याच्याच जिल्ह्यात न्याय मागण्यास सक्षम होईल. परिणामी प्रत्येक नागरिकास न्याय व त्याच्या मूलभूत हक्कांचे निश्चितपणे संरक्षण हे उद्देश काही अंशी पूर्ण होतील. या प्रमुख चार मागण्या उपरोक्त जनहित याचिकेत करण्यात आल्या आहेत.



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## देखो रुठा ना करो ...

' दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी...' असो. वपु काळेंची एक ' पंतवैद्य ' नावाची कथा आहे. आता सविस्तर आठवत नाही. पण या कथेतला जो नवरा असतो तो थोडा भोळा, बावळट वगैरे दाखवला आहे. त्याची बायको मात्र स्मार्ट असते. तीन मुले, आपला संसार आणि नवरा मोठ्या हुशारीने ती सांभाळते. एकदा वपु त्या माणसाला म्हणतात, ' तुम्ही असे वागतात म्हणूनच लोक तुम्हाला बाहेर बावळट म्हणतात. घरात काय परिस्थिती आहे ? तेव्हा तो माणूस उत्तरतो. मी तिला विचारतो, तुला काय हवे ? ' ती म्हणते, ' सत्ता. ' मग ती मला विचारते, ' तुम्हाला काय हवे आहे ? ' मी सांगतो, ' शांतता ' झाले तर मग. तिला हवी ती सत्ता मी देऊन टाकतो आणि मला हवी ती शांतता मला मिळते...! किती बोलकी आहे ही कथा ! लेखात मी काही गमतीदार उदाहरणे दिली असली तरी दोन घटका करमणूक व्हावी म्हणून ! प्रत्यक्षात संसार म्हटला की तडजोड दोघांना करावी लागते कारण संसार दोघांचा असतो. एक जण चुकला तर दुसऱ्याने सांभाळून घ्यायचे असते. कधी कधी पत्नी तिच्या जागी बरोबर असते तर कधी कधी पती सुद्धा...! पण दोघांनीही मीच बरोबर असे म्हटले तर वाद निर्माण झाल्याशिवाय राहणार नाहीत. या ठिकाणी संत कबीरांची वाचलेली एक गोष्ट मला आठवते. ती सांगून मी या लेखाचा शेवट करतो. कबीरांकडे अनेक लोक आपल्या समस्या घेऊन येत असत. एकदा आपल्या पत्नीच्या भांडणामुळे अशीच त्रस्त झालेली एक व्यक्ती त्यांच्याकडे येते. आपली पत्नी आपले अजिबात ऐकत नाही असे सांगून तो माणूस कबीरांना आपल्या समस्येवर तात्काळ काही उपाय सांगा म्हणून विनंती करतो. कबीर शांतपणे त्या माणसाचे ऐकून घेतात. ते आपल्या मुलाला बोलावतात. त्याला म्हणतात, ' बेटा, तुझ्या अम्मीकडे जा आणि तिला सांग की अब्बूनी कंदील लावून मागितला आहे. ' तो मुलगा घरात जातो आणि लावलेला कंदील बाहेर घेऊन येतो. कबीर तो कंदील त्या दोघांच्या मध्ये ठेवतात. आता भर दुपारी त्या कंदिलाचे काय काम असा प्रश्न त्या गृहस्थाला पडतो. पण कबीरांचा काही उद्देश असेल असे वाटून तो गप्प बसतो. आता कबीर आपल्या बायकोला हाक मारून म्हणतात, ' अरी, सुनती हो ? हमारे घर मेहमान आये हैं. उनके लिये दूध का कुछ प्रबंध करो. ' 'जी, अभी लायी,' असं म्हणून कबीरांची बायको घरात जाते. थोड्या वेळाने दुधाने भरलेले दोन ग्लास घेऊन येते. कबीर ग्लास तोंडाला लावल्याबरोबर सारे दूध एका झटक्यात पिऊन टाकतात. तो गृहस्थ मात्र एकच घोट पिल्याबरोबर तोंड वेडेवाकडे करतो. तेव्हा कबीर त्याला विचारतात, ' कुछ समझे भाई ? ' तेव्हा तो गृहस्थ नकारार्थी मान हलवतो. मग कबीर म्हणतात, ' भल्या गृहस्था, मघाशी मी कंदील लावून मागितला. पण माझ्या बायकोने मला काही एक न विचारता कंदील लावून आणून दिला. भर दुपारी कंदील कशाला हवा आहे असं तिनं विचारलं नाही. आता नुकतंच तिनं दूध आणून दिलं. एकवेळ दुधात साखर टाकली नसती तरी चाललं असतं. पण दुधात तिच्या हातून चुकून मीठ पडलं. पण हे मी समजून घेतलं. काही न बोलता दूध पिऊन घेतलं. ठरवलं असतं तर आताच तुझ्यासमोर आमची भांडणं झाली असती. पण असं करायचं नसतो. संसार हा दोघांच्या विश्वासावर उभा असतो. दोघांनी एकमेकांना समजून घ्यायचं असतं. हे ऐकल्यावर तो गृहस्थ समाधानाने परतला. ही कथा आपल्याला खूप काही सांगून जाते.



## आनंदी पहाट

### व्यावसायिक पातळीवरील मार्गदर्शन मोलाचे

आधुनिक केसरी

आधुनिक गरजा आणि अत्यावश्यक बदलांमुळे शिक्षणाचे जग प्रचंड बदलत आहे. सध्याच्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी पारंपारिक शिक्षण पद्धती बदलणे आवश्यक आहे; जे सुमारे एक किंवा दोन दशकांपूर्वीच्या गरजांपेक्षा भिन्न आहे. लक्ष वेधण्याचा कालावधी आणि विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे आकलन करण्याची पद्धत देखील काही काळापासून बदलत आहे. शैक्षणिक संस्थांमधील सर्वात प्रभावी आणि सदाबहार पद्धतींपैकी एक म्हणजे अतिथी व्याख्याने होय. अतिथी व्याख्यात्यांच्या व्याख्यानांचे असंख्य फायदे असतात. ते विद्यार्थ्यांना वेगळ्या दृष्टीकोनातून आणि अधिक प्रभावीपणे शिकण्यास मदत करू शकतात. विशेषतः व्यवस्थापनाच्या अभ्यासात विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट जगताचे अनुभव चाखायलाच हवेत. एक प्राध्यापक व्यावसायिक जगतात प्रत्येक, सर्वच गोष्टीबद्दल ज्ञान आणि मार्गदर्शन देऊ शकतोच असे नाही. उद्योग व्यावसायिकांचे विविध दृष्टीकोन, त्यांचे स्वतःचे प्रत्यक्ष कार्यरत असताना त्यांना मिळालेले अनुभव विद्यार्थ्यांना अंतर्दृष्टी देतात. विशेषतः विद्यार्थ्यांसाठी अतिथी व्याख्यात्यांना आमंत्रित केल्याने विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी आणि शैक्षणिक संस्थांसाठी फायदेच होतात. सर्व वयोगटातील आणि अनुभवाच्या स्तरांचे विद्यार्थी विविधतेसाठी भुकेलेले असतात आणि संस्थेत आपल्या समोर नवीन चेहरा पाहिल्याने वातावरणात जाज्वल्य येते प्रत्येक विषय आणि विचार देखील जिवंत होऊ शकतो; अतिथी व्याख्याता बोलाविण्याची सखोल शैक्षणिक कारणे देखील अभ्यासपूर्वक समजून घेतली पाहिजेत. आपल्यापैकी कोणीही प्रत्येक गोष्टीत तज्ज्ञ नाही, म्हणून एखाद्या विषयात सिद्ध कौशल्य असलेले व्याख्याते आमंत्रित करणे संस्थेच्या व्यवस्थापनाला, सामग्रीला, शिक्षण पद्धतीला अधिक विश्वासार्हता प्रदान करते. हे तज्ज्ञ कदाचित एकाच संस्थेतील प्राध्यापक असू शकतात किंवा शिक्षण क्षेत्रातील, शैक्षणिक समूहातील आणि समुदायातील तज्ज्ञ असू शकतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### प्रेमाचा गुढार्थ | प्रेम जाणे ||

प्रेमाचे हे गीत | प्रेम भावे गावे ||
प्रेमाने जिंकावे | सकळांसी ||१||

द्वेष निंदा भाव | गतीचे रोधक ||
आयुष्या जाचक | क्लेशदायी ||२||

शेच्या मुळाशी | दुःखाचेचं जाळे ||
आपुलेच गळे | कापताती ||३||

मृगजळा संगे | रमतो का मना ||
सुटेल का पान्हा | वांझोटीस ||४||

सावध होऊनी | साधावा भावार्थ ||
प्रेमाचा गुढार्थ | प्रेम जाणे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## “निरूपण”

आधुनिक केसरी

### अंबानामस्मरण महात्म्य

माझिया मना तू न भ्रमे।
येवोत कितीही विभ्रमे।
शरण रेणुकेसी जाये।
लक्ष करी एक तिचे पाये।
संसारी ऐसा नसे भाव।
अलौकिक दिव्यत्व नामे।
स्मरे स्मरे अंबामाये।
हास वाचा मन काये।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।

### ब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

संत कोणास म्हणावे, तत्वचिंतन,तत्वज्ञान हे शब्द एकसारखे वाटतात.पण प्रत्यक्षात ते तसे नाहीत. त्या दोन्ही शब्दांत फरक आहे तो कसा ते पहा. तत्वचिंतक बुध्दीच्या जोरावर बाजू प्रमाण मानतो. तो अत्यंत हुशार असतो. शुध्द विचाराने सद्वस्तुंचें स्वरूप एकदा निश्चित झाले म्हणजे तो तिथेच थांबतो. तत्वचिंतन करण्याची त्याची भूमिका व त्या भूमिकेवर तो ठाम असतो. त्याच्या बरोबर उलट तत्वज्ञानी प्रतिभेच्या जोरावर उभा रहातो. तर्काने विचार करून सद्वस्तुंचे स्वरूप निश्चित झाल्यावर तेथेच न थांबता त्याच्यातील बारकावे शोधू लागतो स्वस्वरूपाच्या अनुसंधनाचा सतत अभ्यास करत रहातो. सतत अभ्यास चिंतन व बारकावे शोधत गेल्यानंतर त्याला सद्वस्तुंचा साक्षात अनुभव येतो. अशा प्रकारे स्वरूपसाक्षात्कार झालेल्यांना संत म्हणतात. संतांची प्रतिभा सतत जागी असते. संतांनी लिहिलेल्या ग्रंथसंपदेस "अध्यात्मग्रंथ म्हणतात. तर सदवस्तूला ब्रम्ह म्हणतात. संत सांगतात की ब्रम्ह सर्व मानवी कल्पनांच्या पलीकडे आहे. स्थळ, काळ, निमित्त यांच्या कक्षेत वावरणाऱ्या द्रुष्य विश्वाचे ज्ञान करून देणारी बुध्दीसुध्दा मर्यादित आहे. विश्वाचा बंध ओलांडून अनंतपणे विलसणारे ब्रम्ह चिमुकल्या मानवी बुध्दीच्या ज्ञानाचा विषय कसा काय होणार. म्हणून ब्रम्ह दर्शन होण्यास बुध्दीच्या पलिकडे असलेली प्रतिभा नावाची ज्ञानशक्तिचा उदय मानवी बुध्दी मध्ये झाला पाहिजे. सद्गुरु च्या आशिर्वादाने प्रतिभा जागी होते. म्हणून परमार्थात सद्गुरूंचा आशिर्वाद फार मोलाचा आहे. **(क्रमशः)**



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## मनाचे श्लोक

आधुनिक केसरी

**तये द्रुपदीकारणे लागवेगें|**
**त्वरे धावतु सर्व सांडूनि मागे||**
**कळीलागि जाला असे बोध्य मौनी|**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानि||१२४||**

**श्लोकार्थ :** द्रौपदी संकटात सापडली असताना सगळी कामे सोडून श्रीहरी तिच्या मदतीसाठी त्वरित धावून गेला. आणि कलीयुगामध्ये (लोकांच्या कल्याणासाठी) बुध्द म्हणूनहि अवतार घेता झाला. भक्ताचा अभिमान बाळगणारा देव कधीही त्याला निराश करत नाही.

**विवेचन :** या श्लोकातील पहिले उदाहरण विष्णूच्या श्रीकृष्ण अवतारातील आहे. द्रौपदी ही त्याची निस्सीम भक्त होती.
द्यूतक्रिडेप्रसंगी दुर्योधन व दुःशासनाकरवी झालेले वस्त्रहरण हा द्रौपदीच्या जीवनातील सर्वात मोठा मानहानीचा प्रसंग होता. त्या प्रसंगात देखील द्रौपदीने आपल्या संयमाची व बुद्धिमत्तेची चुणूक सभाजनांना दाखवून दिली होती. “माझ्या पतीने आधी स्वतःला पणाला लावले असल्यास नंतर मला पणाला लावण्याचा अधिकार त्यांना उरतो का?” या तिच्या प्रश्नाने भीष्म पितामह देखील निरूत्तर केले होते. वस्त्रहरणासारख्या प्रसंगामधे पतींनी सर्व अधिकार गमावल्यानंतर द्रौपदीने आपला सखा श्रीकृष्ण याचा धावा केला होता. तिच्या हाकेला प्रतिसाद देत श्रीकृष्ण सारे काही सोडून, विनाविलंब धावून गेला आणि त्याने द्रौपदीला वस्त्रे पुरवून तिच्या सन्मानाचे रक्षण केले.
बौद्ध अवतार कुणा एका भक्ताच्या विनवणीवरून घेतलेला नव्हता तर अधर्मनाश कुकर्मनाश आणि सद्धर्मस्थापनार्थ घेतला होता. लोकांमधील अज्ञान दूर करून त्याना बोध व्हावा म्हणून घेतलेला होता. राजपुत्र सिध्दार्थ ऊर्फ गौतम म्हणून जन्माला आलेल्या आणि आरामाचे आयुष्य कंठत असलेल्या गौतमाला एकदा राजवाडा सोडून बाहेर फिरत असताना रस्त्यावर एक जराजर्जर माणूस दिसला. दन्तरहित मुख, सफेद आणि विरळ झालेले डोक्यावरचे केस, वाकलेली कृश तनु असा तो माणूस हातात काठी घेऊन थरथरत असा रस्त्यावरून कष्टाने चालत होता. काही दिवसांनंतर त्याच्यासमोर एक आजारी माणूस आला. हातापायाच्या काड्या झालेल्या, पोट फुगलेले, चेहरा पिवळा पडलेला, धापा टाकत आणि दुसऱ्याच्या आधाराने कसातरी चालत होता तो. या दोन दृश्यांनी गौतम अस्वस्थ झाला. तिसऱ्या वेळी त्याने एक प्रेतयात्रा पाहिली. चार लोकांच्या खांद्यावर तिरडी आणि यात्रेत मागून शोकविव्हल नातेवाईक आणि मित्र. कोणी मोठ्याने रडतो आहे तर कोणी छाती बडवून घेत आकांत करतो आहे अशी ती प्रेतयात्रा पाहून गौतमाचे मन पूर्णपणे विटले. त्याच्या मनात यौवन, स्वास्थ्य आणि एकंदरीत जन्ममृत्यू या तिन्हींबद्दल घृणा निर्माण झाली. यौवन, जे शरीराला शोषून घेते. स्वास्थ्य, आरोग्य, जे शरीराला शेवटी नष्टच करते.. जीवन, जे थोड्या अवधीतच समाप्त होऊन जाते! काय उपयोग आहे या सगळ्यांचा माणसाला? जीवनमरणाचं हे चक्र असंच चालू रहाणार आहे का? अंतर्मुख होत चाललेल्या गौतमाला चौथ्या वेळी एक संन्यासी दिसला. लोभ, मोह, माया सगळ्यांपासून मुक्त झालेला, प्रसन्नमुख, शांत चित्त संन्यासी. त्याच्या दर्शनाने प्रभावित होऊन गौतम जन्म, दुःख आणि जरा-मरण, यांच्यापासून मुक्तीच्या शोधात राज्य, मातापिता, पत्नी आणि पुत्र या सगळ्यांचा त्याग करून मौनी, म्हणजे संन्यासी बनून तप करण्यासाठी तो जंगलात निघून गेला. कित्येक वर्षांच्या अन्नपाण्याविना केलेल्या खडतर तपस्येनंतर त्याला बोध झाला. शरीराचे चोचले अथवा शरीरकष्ट या दोन्हींचाहि अतिरेक अयोग्य आहे. मध्यम मार्ग स्वीकारून मनापासून सन्मार्गाला लागले पाहिजे. कर्मकांडे, यज्ञांमध्ये आणि एरवीही भक्षणासाठी केली जाणारी अमर्याद पशुहत्या यांचा अतिरेक टाळला पाहिजे. मनुष्यच्या जन्मजातीपेक्षा त्याचे कर्म महत्वाचे मानले पाहिजे, दुःख, त्याची कारणे आणि त्यांचे निवारण यासाठी ज्ञानदान, बुद्धीची प्रगल्भता, शील, प्रेम, करुणा, अहिंसा, मैत्री आणि समभाव या अष्टांगानी परिपूर्ण असलेल्या जीवनाचे तत्व अनुसरणे म्हणजे सद्धर्मपालन अशा या बोधानंतर त्याने हा धर्मबोध लोकांमध्ये पसरवण्यासाठी प्रयत्न सुरु केले. अशा तऱ्हेने नवीन बौध्दमताचे संस्थापन आणि प्रसार झाला. पुढे बौद्ध देखील मौन झाले....
इथे मौनी असा शब्द आलेला आहे. त्याचेही थोडे चिंतन करू. मौन म्हणजे गप्प राहणे नव्हे, तर जो आपल्या वाणीचा स्वामी आहे, तोच खरा मौनी. एक इंग्रजी सुविचार आहे. Silence is as deep as etrnity and speech is as shallow as time.
आपल्याकडे मौनाचे तीन प्रकार सांगितले आहेत.
१. जे मौन प्रयत्नपूर्वक, जाणीवपूर्वक करावे लागते, ते आकार मौन.
२. चित्तातील वासना कमी करण्यासाठी केले जाते ते का मौन.
३.जे अंतर्बाह्य तृप्तीतून प्राप्त होते ते निर्वासन मौन.
भगवंत होते, भगवंत आहे, आणि पुढेही असेल. प्रश्न असा आहे की तो आपल्याला दिसत नाही ?आपल्याशी का बोलत नाही ? आपल्या हाकेला धावून का येत नाही ? याला अनेक कारणे आहेत. मनुष्य खरी भक्ती करीत नाही, त्यामुळे कलीयुगात देव मौन झाला आहे. सध्या फक्त भक्तीची सूज आली आहे, असे दिसते. मी किती श्रेष्ठ भक्त आहे ! हे दाखविण्याची अहमहिका सुरु आहे. भक्ति मनात असायला हवी, परंतु सध्या भक्तीचे प्रदर्शन मांडण्यात लोकांना धन्यता वाटते, अशी बरीच उदाहरणे आपल्याला बघायला मिळतील. सध्या प्रत्येक उत्सवाला आणि सणाला दिखावू सोहळ्याचे (इव्हेंट) स्वरूप प्राप्त झाले आहे, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. आपल्या जीवनात राम यावा, आपल्या आयुष्याचे रामायण झाले तरी चालेल, परंतु महाभारत होऊ नये यासाठी विशेष काळजी घ्यावी. त्यासाठी उत्तम भक्त होण्याचा प्रयत्न करावा. देव भक्तांची काळजी घेतोच, त्याबाबत मनात संदेह आणू नये, निश्चिंत होऊन नामस्मरण करावे.
"परमेश्वराचीं अनंत नामें | स्मरतां तरिजे नित्यनेमें ||
नामस्मरण करितां येमें | बाधिजेना ||" (दा. ४.३.१९)

**|| जय जय रघुवीर समर्थ ||**




दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

# राऊत-आव्हाडांवरील गुन्हे मागे घ्या मी तुमच्या पक्षात प्रवेश करील

## ठाकरे गटाच्या माजी नगरसेविकेचे मुख्यमंत्री शिंदे यांना पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**नवीन नाशिक :** राज्यातील सत्तांतर नाट्यानंतर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात दररोज घडणाऱ्या राजकीय घडामोडी संपूर्ण देशात चर्चेचा विषय ठरत आहेत. आता नाशिकच्या नवीन नाशिक विभागातून ठाकरे गटाच्या शिवसेनेच्या माजी नगरसेविका किरण दराडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेल्या पत्राची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.
राज्यात राजकिय विरोधकांवर गुन्हे दाखल करून विरोधकांना संपविण्याचा प्रयत्न केला जात असून विरोधकांना कायद्याच्या चौकटीत अडकवून सरकार सूडबुद्धीने कारवाई करत असल्याचा आरोप केला जात आहे. त्यातच आता नाशिकच्या ठाकरे गटाच्या एका माजी नगरसेविकेने यांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून आपण बिनशर्त शिंदे गटात प्रवेश करण्यास तयार असल्याचे जाहिर केले आहे.
त्यासाठी त्यांनी एक अट ठेवली असून त्यानुसार संजय राऊत आणि जितेंद्र आव्हाडांवरील गुन्हे मागे घेण्याचे आवाहन केले आहे. दोन्ही नेत्यांवरील गुन्हे मागे घेतल्यास स्वतःसह सहकारी तीन




नगरसेविकांसह आपण शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचे घोषीत केले आहे. त्यांच्या या पत्राने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चेला उधाण अलेअसून त्यांचे " ते " पत्र सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. शिंदे - फडणवीस सरकार विरोधकांवर दबाव आणण्यासाठी सूडबुद्धीने खोटे गुन्हे दाखल करत असून विरोधकांचा आवाज दाबण्याचे काम हे सरकार करत आहे अश्या प्रकारचा सूर निघत आहे. पत्रातील मजकूर मुख्यमंत्री महोदय गेल्या चार दिवसात जितेंद्र आव्हाड साहेब यांच्यावर व्यक्तिगत दोष मनात धरून दोन खोटे गुन्हे दाखल केले, तुरुंगात डांबले त्याचप्रमाणे खासदार संजय राऊत साहेब यांना बेकायदेशीर अटक केली. हे सर्व प्रकार निषेधार्थ आहेत. माननीय जितेंद्र आव्हाड व खासदार संजय राऊत यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घेतल्यास आपला सन्मान करीत मी नगरसेविका किरण दराडे व माझ्या तीन सहकारी नगरसेविकांसह आम्ही बिनशर्त शिंदे गटात धुमधडाक्यात प्रवेश करणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

# लोकप्रतिनिधीवर विनयभंगाचे कलम लावणे भ्याड प्रकार : विरोधी पक्षनेते अजित पवार

## 'चार दिवस सासूचे तसेच चार दिवस सुनेचे'



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकप्रतिनिधीवर विनयभंगाचे कलम लावणे हा अतिशय भ्याड प्रकार असून सरकारने हा गुन्हा मागे घ्यावा अशी आग्रही मागणी राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्यावर २४ तासात दोन गुन्हे दाखल करण्यात आले. त्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. 'चार दिवस सासूचे तसेच चार दिवस सुनेचे' असतात ही गोष्ट लक्षात घ्यावी असा स्पष्ट इशाराही पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिला. या प्रकरणात राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. अशाप्रकारचे वातावरण करून जे महत्त्वाचे विषय आहेत त्याला बगल देण्याचे काम होते हे महाराष्ट्राला मारक आहे असेही अजित पवार यावेळी म्हणाले. सरकारने लोकप्रतिनिधी कोणत्या पक्षाचा आहे हे न पहाता जर कुणी कायदा हाती घेतला. चूक केली, नियमाप्रमाणे वागले नाही तर जरूर कारवाई करावी. मात्र कुणीतरी कारण नसताना नवीन जे कायदे - नियम केले आहेत त्याचा आधार घेऊन लोकप्रतिनिधीला बदनाम करण्याचे, जनमानसात त्यांची प्रतिमा मलिन करण्याचे काम करत असेल तर याकडे जनतेने जागरुकतेने पहावे असे आवाहनही पवार यांनी यावेळी केले.

# सर्व जिल्ह्यांमध्ये पोलीस भरतीसाठी अर्ज भरण्याची संधी द्या

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** एका जिल्ह्यातील उमेदवार हा केवळ एकाच जिल्ह्यातील पोलीस भरतीसाठी अर्ज करू शकतो, अशी जाचक अट उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. या अटीमुळे राज्यातील हजारो पोलीस भरतीसाठी तयारी करणाऱ्या उमेदवारांवर अन्याय होणार आहे. त्यामुळे उमेदवाराला राज्यातील कोणत्याही जिल्ह्यातील पोलीस भरतीसाठी एकाचवेळी अर्ज करता यायला हवा. या मागणीसाठी आज संविधान चौकात शेकडो युवक-युवतींनी आंदोलन केले. उमेदवारांनी आज राज्य शासनाच्या निर्णयाचा निषेध व्यक्त करीत त्वरित शुद्धीपत्रक काढून ही अन्यायकारक अट रद्द करण्याची मागणी केली. नागपूर जिल्हा आणि शहरातील विविध भागातून युवक संविधान चौकात जमले होते. त्यांनी शिंदे-फडणवीस सरकारच्या निर्णयाविरोधी



निदर्शने केली. राज्यात पोलीस विभागात १८००० पोलीस जागा भरण्यात येणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पोलीस भरतीसाठी युवक-युवती तयारी करीत होते. ज्या जिल्ह्यात जास्त जागा असतील त्या जिल्ह्यात अर्ज भरता येत होता. परंतु, आता पोर्टलवर एकच अर्ज केल्यानंतर दुसरा अर्ज भरता येत नाही. त्यामुळे उमेदवारांच्या अडचणीत वाढ झाली आहे. आंदोलनकर्त्यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपुरातील कार्यालयात निवेदन दिले आहे.

### पोलीस भरतीतील जाचक अट रद्द करा' ; गोपीचंद पडळकर




पोलीस भरती प्रक्रीयेत इतर मागास, भटक्या विमुक्त जमाती, जाती व विशेष मागास प्रवर्गातील उत्तीर्ण उमेदवारांना १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२ या वर्षातील नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट आहे. या अटीतील तारखेमुळे विद्यार्थ्यांमध्ये एक संभ्रम निर्माण झाला आहे. तांत्रिकदृष्ट्या विशिष्ट तारखेतीलच प्रमाणपत्र सादर करणे हे उमेदवारांना अशक्य आहे. यामुळे हजारो बहुजन विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे तारखेची अट शिथिल करावी अशी मागणी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. महाराष्ट्रातील बेरोजगार तरूणांचा विचार करता आपल्या मार्गदर्शनाखाली गृह विभागामार्फत मेगा पोलीस भरती होत आहे. मात्र, ती करताना काही अटी जाचक ठरत आहे. तरी बहुजन विद्यार्थ्यांचा विचार करावा, अशी मागणी पडळकर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात केली आहे.

# नागपुरात घनकचरा व्यवस्थापनाचा देशातील पहिला नाविन्यपूर्ण प्रकल्प

## देवेंद्र फडणवीसांची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** शहरातील घनकचऱ्यावर प्रक्रिया व व्यवस्थापन या संदर्भातील प्रकल्प नागपूरमध्ये नेदरलँडची कंपनी सुरू करणार आहे. यासंदर्भात रविवारी नागपुरात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. नागपुरात होणारा हा अशाप्रकारचा देशातील पहिला नाविन्यपूर्ण प्रकल्प असेल, असा दावा करण्यात आला आहे महाराष्ट्रातून विशेषतः नागपूरमध्ये येण्याची शक्यता असणारे काही प्रकल्प गुजरातमध्ये गेल्याने नागपूरकरांसह वैदर्भीयांमध्ये नाराजीचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर रविवारी शहरातील घनकचऱ्यांच्या संदर्भातील मोठ्या प्रकल्पाची घोषणा फडणवीस यांच्याकडून करण्यात आली. रविवारी फडणवीस यांनी नेदरलँड येथील एसयूएसबीडीई (सस्टेनेबल बिझनेस डेव्हलपमेन्ट) कंपनीचे अध्यक्ष जॉप व्हीनेनबॉस यांच्यासह आमदार प्रवीण दटके महापालिका आयुक्त राधाकृष्णन बी. व अन्य अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी कंपनीसोबत करार करण्यात आला. नागपूर शहरातील घनकचऱ्यावर प्रक्रिया



करण्यासाठी महापालिकेला एकही रुपया खर्च येणार नाही. नेदरलँड येथील एसयूएसबीडीई कंपनी स्वतःच हा प्रकल्प स्वखर्चाने उभा करेल व त्यांचे संचालन करेल. त्याची देखभाल दुरुस्तीही कंपनी करणार आहे. कालबद्ध मर्यादेत हा प्रकल्प सुरू करण्याचे निर्देश फडणवीस यांनी दिले व एका वर्षात प्रकल्प सुरू व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. या प्रकल्पात जगातील नवीनतम तंत्रज्ञानाचा वापर करून वैज्ञानिक पद्धतीने घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. यातून अक्षय ऊर्जा निर्मिती, बायो सीएनजी, बायोगॅस, खते आणि पुनर्वापर करता येणारी उत्पादने तयार केली जाणार आहे.

# जितेंद्र आव्हाडांवर जाणूनबुजून व सुडबुद्धीने विनयभंगाची कारवाई

## राष्ट्रवादी काँग्रेस त्यांच्या पाठीशी : महेश तपासे

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर जाणूनबुजून व सुडबुद्धीने विनयभंगाची कारवाई करण्यात आली असून जितेंद्र आव्हाड यांच्या पाठीशी संपूर्ण राष्ट्रवादी काँग्रेस असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी दिली. कळवा - मुंब्रा उड्डाण पुलाच्या उद्घाटनप्रसंगी आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मुख्यमंत्र्यांवर श्रेयवादाची टिका केली होती त्यातूनच ही कारवाई झाली आहे असेही महेश तपासे म्हणाले. राज्यघटनेच्या संरक्षणार्थ आवाज उठवणारे लढवय्ये नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर विनयभंगाचा खोटा गुन्हा शिंदे - फडणवीस सरकारने दाखल केला आहे. ज्या महिलेने व्हिडीओ दिला आहे तो मुख्यमंत्र्यांचा कार्यक्रम आहे. त्यात इतकी गर्दी आहे की, स्वतः वाट काढत आणि पोलीसही त्यांना पुढे जाण्यासाठी सर्वांना बाजुला करत आहेत हे दिसत आहेत. त्यात ती महिलाही आहे. अशावेळी विनयभंगाचा गुन्हा होतो का हा जनतेच्या मनात प्रश्न निर्माण झाला आहे असेही महेश तपासे म्हणाले. राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणाविरोधात जितेंद्र आव्हाड हे आवाज उठवत आले आहेत. भूमिका मांडत आले आहेत. त्यामुळे हात लावून कुणाला बाजूला केले असेल तर तो विनयभंगाचा गुन्हा दाखल होतो का? याची माहिती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी आधी करुन घ्यावी असा सल्लाही महेश तपासे यांनी दिला आहे.

कितीही ज्ञान असले तरी बोलता आले पाहिजे
जालना शहरात
भाषणकलेची कार्यशाळा
दर रविवारी २ तास, प्रत्यक्ष सरावातून प्रशिक्षण
* व्हाट्सप संपर्क *
विनोद जैतमहाल
9823028332
SPEAKER'S ACADEMY
भाषणकलेची कार्यशाळा
Changing lives since 2016

# विलीनीकरण

आधुनिक केसरी

टाटा समूहाने नुकतीच सरकारी विमान कंपनी एअर इंडिया विकत घेतली. टाटा सन्स आता त्यांच्या उर्वरित तीन एअरलाइन्स विस्तारा, एअर एशिया आणि एअर इंडिया एक्सप्रेस एअर इंडियामध्ये विलीन करणार आहे. एअर इंडियामध्ये त्यांचे विलीनीकरण करण्याची प्रक्रियाही सुरू झाली आहे. टाटा सन्सचे हे नियोजन यशस्वी झाल्यास एअर इंडिया फ्लीट आणि मार्केट शेअरच्या बाबतीत देशातील दुसरी सर्वात मोठी एअरलाइन बनेल. सिंगापूर एअरलाइन्स ही टाटा समूहाची भागीदार आहे. टाटा यांनी सिंगापूर एअरलाइन्सशी याबाबत बोलणी केल्याचे समजते. इकॉनॉमिक टाईम्सच्या रिपोर्टनुसार ही बातमी समोर येते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एअर इंडिया कमी किंमतीत पूर्ण सेवा देणारी विमानसेवा असेल. आठवडाभरात याबाबत अधिकृत घोषणा होऊ शकते. दोन्ही विमान कंपन्या लवकरच व्यावसायिक ऑपरेशन सुरू करू शकतात. पण एक संस्था म्हणून काम सुरू होण्यासाठी एक वर्षापेक्षा जास्त कालावधी लागू शकतो. रिपोर्टनुसार, टाटांनी सिंगापूर एअरलाइन्सशी याबाबत चर्चा केली असून विस्तारा टाटामध्ये विलीन करण्याचे मान्य केले आहे. सिंगापूर एअरलाइन्स टाटा समूहाच्या विस्तारामध्ये भागीदार आहे आणि या विलीनीकरणानंतर, विस्तारा चालवणारी टाटा सिंगापूर एअरलाइन्स एअर इंडियामध्ये विलीन होऊ शकते. या एकत्रीकरणानंतर एअर इंडिया कमी किमतीची विमानसेवा आणि पूर्ण सेवा देणारी विमानसेवा तयार होईल. ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी एक वर्ष लागू शकेल. विस्तारा आणि एअर इंडिया लवकरच व्यावसायिक कामकाज सुरू करू शकतात. मात्र, टाटा सन्स आणि विस्ताराने सध्या यावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. सिंगापूर एअरलाइन्सची एअर इंडियामध्ये 20-25 टक्के भागीदारी असेल. यासोबतच 'विस्तारा'च्या काही बोर्ड सदस्यांना एअर इंडियाच्या बोर्डात समाविष्ट करण्यात येणार असल्याचे बोलले जाते. सध्या, सिंगापूर एअरलाइन्सची विस्ताराची मूळ कंपनी टाटा सिंगापूर एअरलाइन्समध्ये 49 टक्के भागीदारी आहे. टाटा सन्स आणि विस्ताराने यावर भाष्य केले नाही. विस्तारामध्ये टाटा सन्सची 51 टक्के हिस्सेदारी आहे. अलीकडेच टाटा समूहाने एअर इंडिया एक्सप्रेस आणि एअरएशिया इंडियाचे एकत्रीकरण पूर्ण केले.

# समाधानी पिढी आता आपल्याला सोडून जातेय



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**जुनी पिढी म्हणजे अशी माणसं ज्यांच वय साधारणतः ८० ते ९० च्या घरात आहे. आम्ही म्हटलं तर मधल्या पिढीतले ज्यांनी मागच्या पिढीतलं बरच काही जवळून बघितलय आणि नव्या पिढीला अनुभवतोय. अत्यंत समाधानी असणाऱ्या या मागच्या पिढीबद्दल नव्या पिढीला फारसं काही माहिती नाही. येत्या १० ते १५ वर्षांमध्ये ही जुनी पिढी जिचा काळच वेगळा होता ती आपल्याला सोडून जाणार आहे. नव्या पिढीला या जुन्या पिढीतील कळाव म्हणून हा लेख प्रपंच.**

उद्याची चिंता नसणारी, अत्यंत समाधानाने जगणारी ही पिढी. जी कमी पैशातही आनंदी असायची. लवकर झोपणारी व सकाळी लवकर उठणारी ही पिढी. जिची दिवसाची सुरुवात प्रसन्न पहाटेने व्हायची. भूपाळी ऐकायला मिळायची. सकाळ होताच पक्षांचा किलबिलाट ऐकू यायचा. कोंबडा आरवायचा. दंड-बैठकांना सुरुवात व्हायची. सगळे पुजा-पाठाला लागायचे. आजच्या सारखी धावपळ नव्हती. कुठे जायची घाई नसायची. मोठे ताजी पोळीभाजी घेऊन कामाला जायचे तर लहान हुंदडत शाळेत. स्कुटर, कारचा जमाना नव्हता, दोन पायावर मात्र विश्वास होता. आजच्या सारखी वाहनं न मोठ्यांना लागायची न लहानांना शाळेत जाण्यासाठी स्कूल बस. सर्वात मोठं वाहन काय तर सायकल. एकाच सायकलवर चौबलसीट घेऊन जायचा दम होता. ना पिकनिकला ना टुरला जाणं होत. मैदानी खेळ खेळले जायचे. कबड्डी, लंगडी, कंचे (गोट्या), विटीदांडू हे खेळ खेळले जायचे. एकत्र येऊन खेळल्यामुळे आयुष्यभराचे मित्र जुळले जायचे. मोबाईल किंवा करमणुकीची आजच्यासारखी डिजिटल साधनं नसल्याने एकमेकांसाठी भरपूर वेळ होता, दिवस-रात्रीचा वेळ हा कुटुंबियांसाठी असायचा. कमी पैशात सगळा आनंद होता. नाटक, सिनेमा मुलांना दाखवणं माहित नव्हतं, केव्हा असं कधीच नव्हतं. मुलांना जरबेत ठेवण्याचा अधिकार होता, मुलांना वेगळा वेळ देण्याचा प्रश्नचं नव्हता. लग्न वडीलधाऱ्या मंडळीकडून बांधली जायची. मुलींची लग्न उपवर होताच लवकर लावली जायची. त्यामुळे फ्रॉकातून लवकर साडीत जायचे लागायचे. आवाज उठवायची सोय नव्हती. काहीही बोलायची हिंमत नव्हती, जसं आहे तसं पत्करावं लागायचं. पदरात पडलेलं पवित्र असायचं. मुलांच्या शाळेच्या गरजा खूप कमी होत्या. डोनेशन सारख्या गोष्टी नव्हत्या. मिळेल त्या शाळेत ॲडमिशन व्हायचे. गाईडची सोय नव्हती. शिकवणीचा तर प्रकार नव्हताच. त्यामुळे पुस्तकांचा आधार होता. पुस्तक ही सहसा जुनीच वापरलेली असायची, तीही वेळेवर भेटत नसत. पेन्सील, रबर वर्षातून एकदाच मिळे. एकच दप्तर शाळा संपेपर्यंत चालायचे. दप्तर म्हणजे तरी काय, साधी गोणपाटाची पिशवी असायची ती. शाळेत रोज भाजी-पोळीचाच डब्बा असायचा. कधी-कधी गूळ -तूप पोळीचा मेवा असायचा. गुरूजींचा, बाईंचा मुलांवर मोठा धाक होता. धडे-पाढे लगेच पाठ व्हायचे. त्यामुळे गणित कधी चुकायचे नाही तर व्याकरण नाही जमत असं व्हायचे नाही. आणि जर काही चूक झालीच तर गुरूजी कान पिळायचे, प्रसंगी झोडपायचे. आपली मुलं नेमक कोणत्या वर्गात शिकताहेत हे फार कमी पालकांना माहित असायच. पण शिक्षणाला खूप महत्व होत, शिक्षण हेच केवळ लक्ष्य होत. कपडे फार कमी मिळायची. दोन सदरा-चड्डी, फ्रॉक वर्षभर चालायचे आणि फाटलेच तर ठिगळ लावून वापरायचे. कुणाच्या चपला, कपडे कुणीपण वापरायच्या. तुझं-माझं अस काही नसायच.

सण मोठ्या उत्साहाने साजरे व्हायचे. फक्त सणा-सुदीलाच गोड-धोड व्हायचे. संक्रातीला तर महिला वर्ग नटून- थटून बसायचा.



दिमाखात हळदी- कुंकू साजरं व्हायच. दिवाळीची तर विशेष मजा असायची. पहाटे अभंग्यस्नानाची घाई असायची. सुगंधी अंगावर नवे कपडे चढवायचे, मनसोक्त फटाके उडवायचे. घरगुती स्वर्गीय फराळाचा आस्वाद, आनंद घेतला जायचा. मोकळ्या वेळात दिवाळी अंक वाचला जायचा. गप्पा-टप्पा करत दिवाळीच्या सुट्ट्या कधी गेल्या ते कळत नसे. उन्हाळ्यात तर खरी बहार यायची. आंब्याच्या खोली समोर टोपली भरून आंबे खायला मज्जा यायची. उन्हाळी कामांना वेग यायचा. महिला वर्गाची पापड्या-कुरवड्या करायची जणू चढाओढ लागायची. त्या लख्ख उन्हात वाळवायच्या. रात्री थंडगार पन्ह प्यायच आणि रात्रीच्या चांदन्यात गप्पा मारत गच्चीवर झोपी जायच.

संयुक्त कुटुंब पद्धतीवर विश्वास असायचा. त्यामुळे घर नेहमी माणसांनी भरलेल असायच. एकमेकांना आधार होता. सगळे मिळून प्रश्न सोडवायचे. घरात मोठ्यांचा मोठा धाक होता. त्यांच्या शब्दाला मोठा मान होता. व्यवस्थितपणा शिवाय पर्याय नव्हता. कामाचे वाटप नकळत व्हायचे. घरातल्या प्रत्येकाला त्याची जबाबदारी आणि कामे वाटून दिलेली असायची. हात-पाय सारखे चालत असायचे. हसत-खेळत कामाचा डोंगर उपसला जायचा. थोडीशी कुरबुर व्हायचीच पण ती मोठी माणसं सावरायची. स्वंयपाक घरात बायकांची मक्तेदारी असायची. पाहुण्यांचा घरात नेहमी राबता होता. त्यामुळे चुलीवर चहाच धड हे चढलेलच असायच. दिवस कधी संपला हे कळायचं नाही. दिवे लागण्याच्या आत सगळे घरी यायची. देवाला दिवा लावून शुभम करोती म्हणायची. सर्वांनी मिळून साधसं सात्विक जेवण करायच आणि गुजगोष्टी करत अंथरूणावर आडवं व्हायचं.

ही लोकं खूप प्रेमळ होती. माणुसकीने भरलेली होती. जीव गेला तरी चालेल पण दिलेला शब्द पाळणारी होती. लोकांचा एकमेकांवर विश्वास होता. रस्त्यात भेटणा-या प्रत्येकाला दोन्ही हात छातीशी नेऊन नमस्कार केला जायचा. एकमेकांची आस्थेने चौकशी केली जायची. संकटकाळी एकमेकांना जमेल तशी मदत करणारी ही पिढी. उधळपट्टी पेक्षा खिशातला पैसा जपून वापरणारी आणि शक्यतो घरीच जेवणारी ही पिढी. साधं राहणीमान असणारी, समाधानी, अर्थपूर्ण आणि दुस-यांना प्रेरणा देणारी ही पिढी. समोरच्यांची काळजी करत जीवन जगायच असत ही या पिढीची शिकवण.

ओसरीवर नाहीतर पारावर बसलेली ही डोळे विझत चाललेली म्हातारी माणसं म्हणजे आयुष्यातील चालती बोलती विद्यापीठं. कपडे नेहमीच जुने पण स्वच्छ. पायात झिजलेल्या वहाणा, डोळ्यावरचा चष्मा किमान दोन-तीन ठिकाणी जोडलेला वा दोरीने बांधलेला. गळ्यात तुळशीची माळ आणि कडदोरा हीच काय त्यांची संपत्ती. मंदिरातून घरी आल्यावर नातवाला घेऊन गावभर अभिमानाने मिरवतील. पारावर बसुन एकमेकांशी गप्पा मारणारी. एक बोलणार आणि बाकी सर्व ऐकणार. गप्पांचे विषय अगदी साधे आणि सोपे. माती अनं नाती. डोळ्यात आसवं आली तरी धोतराच्या सोग्याने कुणालाही कळणार नाही अशी अलगद पुसतील. डोळ्यात पाणी का आले याची कधी वाच्यताही करणार नाहीत. ना बीपी न डायबेटिस. माफक गरजा आणि माफक आवडी निवडी. मोबाईल, कॉम्प्युटर, सोशल मीडिया, लाफ्टर क्लब, मॉर्निंग वॉक अशा कोणत्याही सोंगाची त्यांना गरज नाही. स्वतःचे आयुष्य हेच त्यांचे तत्वज्ञान. गावातल्या कुशीत जन्माला येऊन शिवारातल्या मातीत हसतमुखाने प्राण सोडणारी. असे लोक आता हळूहळू हे जग सोडून चालले आहेत. त्यांच्या सोबत त्यांची महत्वाची शिकवण ही त्यांच्याबरोबरच जाईल. त्यानंतर राहिल तो फक्त स्वार्थ, अविश्वास, चैन, वखवख, असंवेदनशिल मन, भकास, कोडेगेपणा असणारी, मोबाईलच्या आभासी जगात जगणारी आधुनिक पिढी. कटू आहे पण हेच सत्य आहे.

# मुले म्हणजे देवाघरची फुले



लक्ष्मण जगताप
बारामती

आधुनिक केसरी

**फुलांप्रमाणे टवटवीत आणि गोड असणारी लहान मुलं आपल्याला खूप आनंद देतात. फुले जशी मन वेधून घेतात त्याप्रमाणे मुलं आपले लक्ष वेधून घेतात. त्यांचे बोबडे बोल न आवडणारी व्यक्ती सापडणार नाही. मनावर आलेला ताण हलका करण्यासाठी लहान मुलांच्याच रमले पाहिजे. त्यांच्या भावविश्वातील गप्पा ऐकून ताण कुठल्या कुठे पळून जातो हे कळत नाही. त्यांचे मन हे वाहत्या पाण्यासारखे स्वच्छ, निर्मळ आणि पवित्र असते.त्यामुळे त्यांच्या मुखातून बाहेर पडणारे बोल आपल्याला खूप काही शिकवून आणि आनंद देऊन जातात.**

१४ नोव्हेंबर. चाचा नेहरु यांचा जन्मदिवस. चाचा नेहरू यांना लहान मुले खूप आवडायची. म्हणून त्यांच्या जन्मदिवस बालदिन साजरा केला जातो. बालपणीचा काळ सुखाचा असं म्हटलं जातं. कारण आयुष्यातील सगळ्यात जास्त आनंद बालपणीच मिळतो.

लहान मुलांना फुलपाखरांसारखं स्वच्छंदी जगता येतं. चेहऱ्यावर निरागसता आणि मनात निर्मळता ही लहान मुलांच्याच पहायला मिळते. लहान असेपर्यंत कोणतीही जबाबदारी नाही की कोणतेही काम नाही. मनसोक्त खेळणं, बागडणं, हसणं, उड्या मारणं, पळणं, मनाला वाटेल तसं वागणं हे फक्त बालपणीच मुलांना जमतं. बालवयातच त्यांचं खरं जगणं होतं. एकदा का वय वाढू लागले की वाढत्या वयाबरोबर मोठे झाल्याने जबाबदारीचे ओझे येते. या ओझ्याने काय होते? हे सगळ्यांनीच अनुभवलं आहे.

फुलांप्रमाणे टवटवीत आणि गोड असणारी लहान मुलं आपल्याला खूप आनंद देतात. फुले जशी मन वेधून घेतात त्याप्रमाणे मुलं आपले लक्ष वेधून घेतात. त्यांचे बोबडे बोल न आवडणारी व्यक्ती सापडणार नाही. मनावर आलेला ताण हलका करण्यासाठी लहान मुलांच्याच रमले पाहिजे. त्यांच्या भावविश्वातील गप्पा ऐकून ताण कुठल्या कुठे पळून जातो हे कळत नाही. त्यांचे मन हे वाहत्या पाण्यासारखे स्वच्छ, निर्मळ आणि पवित्र असते.त्यामुळे त्यांच्या मुखातून बाहेर पडणारे बोल आपल्याला खूप काही शिकवून आणि आनंद देऊन जातात.

लहान असताना वडाच्या झाडाला खेळलेल्या सूर पारंब्या, आबंट चिंचा व बोरे खाताना आलेली मजा तर काही निराळीच असते. आईच्या कडेवर आणि बाबांच्या पाठकुळीवर बसण्यात मिळालेले सुख मिळते हे मोठेपणी कशातच मिळत नाही. लहानपणी शाळेतील मित्रांबरोबर खेळण्यात मिळालेल्या आनंदाची सर मोठे झाल्यावर कितीही खेळले तरी त्याला नाही.

लहान मुलांच्या बाललीला सर्वांनाच आवडतात. घरातील वातावरण हलकेफुलके आणि आनंदमय ठेवण्यात बालकांचा खूप मोठा वाटा असतो. मुलांमुळे घराला चैतन्य येते.आणि घराला घरपण येते.



शाळेला जिवंतपणा केवळ मुलांमुळेच येतो.मुले नसतील तर त्या केवळ निर्जीव भिंती ठरतील. आपली खरी संपत्ती मुलेच आहेत. त्यांना आपले बालपण ताणविरहित ,भयमुक्त आणि आनंददायी जगता यावे यासाठी सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे सर्वांची मोठी जबाबदारी आहे.

बालपणी त्यांना जेवढा आनंद मिळेल तेवढे त्यांचे व्यक्तिमत्त्व चांगल्या प्रकारे विकसित होईल.पण आज खेळण्याच्या वयातच मुलांना शिशु गटात घालून एक प्रकारे नकळत का होईना मानसिक ताणाला सामोरे जावे लागते .त्यावेळी वाटतं आपण त्यांचे बालपण तर हिरावून घेत नाही ना ? हे खेदाने म्हणावेसे वाटते.

मुलांना स्वातंत्र्य हवे ,पण त्याच वेळी योग्य वळण लावण्यासाठी शिस्तीही हवी. लहान मुले ही उद्याची समाजाची आणि देशाची आधार स्तंभ आहेत .त्यांना जपले पाहिजे .त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून शिक्षणाची संधी दिली पाहिजे.आजही अनेक मुले वेगवेगळ्या कारणांनी शिक्षणापासून दूर आहेत .शिक्षण घेण्याच्या वयात पोटाची खळगी भरण्यासाठी बालकामगार म्हणून काम करावे लागते.प्रत्येक मूल शाळेत गेलं पाहिजे ,टिकलं पाहिजे आणि शिकलं पाहिजे हे समाज म्हणून सर्वांची जबाबदारी आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९


Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# नाळेच्या अंगानं पार वाळंत चाललोईत आपण !

आधुनिक केसरी

**आई-बापाच्या हेळसांडीच्या बातम्यांनी तर मनाचा पार चोळामोळा होवून जातं मन. कृतघ्न लेकरांची बातमी वाचली की मनाला प्रचंड वेदना होतात. सगळ्या शाळा, महाविद्यालयांवरुन आठ बैली नांगर फिरवावा वाटतो सनकीत आणि सगळी पुस्तकं बुडवावीत खोल प्रशांत महासागराच्या तळाशी. साला एक मुळाक्षर रुजू नये मनात आदरभावाचं ! दोन बातम्या वाचण्यात आल्या होत्या मागे, मन बधीर करुन टाकणाऱ्या, तुम्हीही वाचल्या असतील, मी ही वाचल्या आणि आपल्या सगळ्यांनीही अगतीकतेनं घेतलं असणार आहे हे सारंच ! या दोन घटनांनी जीव अक्षरश: लज्जीत करुन टाकला. आपलं शिक्षण किती तकलादू होत चाललं आहे याचा अनुभव घेतला. कुणाला म्हणावं शिकलेला? या प्रश्नांनी जीव मेटाकुटीला आणला. रहावलं नाही म्हणून ही खटाटोप, हा शब्दप्रपंच.**

## संयमाचा परीघ



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9834367059



चित्र : बाबूराव पाटील

भाग : 2

रोज वृत्तपत्रातील बातम्या वाचून मन सुन्न हेवून जातं. मनाला उभारी देणाऱ्या बातम्यांची संख्या कमी असते. रोज राजकीय आक्रोश, बालिकांवरील बलात्कार, रोज दरोडे, रोज ॲक्सिडंट्स, रोज रक्तपात, रोज घातपात, रोज भोंदुबाबांचे कारनामे, रोज बुद्धिवंतांच्या अनैतिक वर्तनांनी भरलेले कॉलम्स, राजकिय लोकांची टोलवाटोलवी, विरोधासाठी विरोध, रोज कुठल्या ना कुठल्या आपत्तीची बातमी ठरलेलीच.बरं त्यातुन कांही गंभीर चिंतन तरी समोर येतं का की कुठली वाट तरी सांगीतली जाते विवेकानं निवडावी अशी ? मनाची पार वाट लागून जाते.

हत्या, आत्महत्यांनी रोज लालबुंद पानं डोळ्याला अक्षरशः टचटचा टोचंत राहतात. अगतीकता वाढंत जाते राजे रोज आणि रोजंच असुरक्षीततेनं मन पोखरंत रहातं. आता कत्तईच संविधान संम्मत देश उरला नाही आपला हेच पदोपदी येत चाललंय प्रत्ययास. एकाही रंगाबद्दल वाटावी अपुलकी असं कांहीच उरलं नाही कशातंच. ही इतकी घोर निराशा बांधते पदरात रोज सकाळ. मन प्रसन्न व्हावं असं पान नाही की मजकुर कसला. मनाला कवळी पालवी फोडू शकेल असे आश्वासक चार शब्द नसावेत का कुणाजवळ सांगण्यासारखे? किमान दुःखाबद्दलच बोलायचंय तर मग किमान उथळपणा तरी टाळता यावा. वाचणाऱ्या माणसाला विचार करायला भाग पाडलं जावं चार आपुलकीच्या शब्दांनी.

आई-बापाच्या हेळसांडीच्या बातम्यांनी तरमनाचा पार चोळामोळा होवून जातं मन. कृतघ्न लेकरांची बातमी वाचली की मनाला प्रचंड वेदना होतात. सगळ्या शाळा, महाविद्यालयांवरुन आठ बैली नांगर फिरवावा वाटतो सनकीत आणि सगळी पुस्तकं बुडवावीत खोल प्रशांत महासागराच्या तळाशी. साला एक मुळाक्षर रुजू नये मनात आदरभावाचं ! दोन बातम्या वाचण्यात आल्या होत्या मागे, मन बधीर करुन टाकणाऱ्या, तुम्हीही वाचल्या असतील, मी ही वाचल्या आणि आपल्या सगळ्यांनीही अगतीकतेनं घेतलं असणार आहे हे सारंच ! या दोन घटनांनी जीव अक्षरशः लज्जीत करुन टाकला. आपलं शिक्षण किती तकलादू होत चाललं आहे याचा अनुभव घेतला. कुणाला म्हणावं शिकलेला? या प्रश्नांनी जीव मेटाकुटीला आणला. रहावलं नाही म्हणून ही खटाटोप, हा शब्दप्रपंच.

### एक

एम. डी. डॉक्टर मराठवाड्यातले.चाईल्ड स्पेशालिस्ट.वृद्धाश्रमात वारले. मुलगा, सून अमेरीकेत डॉक्टर आहेत.वडील थकले. मुलं आले नाहीत. आपला दवाखाना चलवा म्हणाले, या परंत. नाही आले. रमले ते रमलेच तिकडं. ना नातवांचा सहवास ना लेकराबाळांची काटी म्हातारपणाला. डॉक्टर समाजसेवी. नवरा- बायको दोघंच दवाखाना चालवंत राहिले परीसरात. डॉक्टर थकले. वृद्धाश्रमातच बस्तान मांडलं. डॉक्टरांनी मुलाला तसं कळवलंही.परत येवून आपला दवाखाना सांभाळ म्हणाले, रुग्नांची सेवा कर म्हणूनही सांगीतलं. मुलगा आला नाही. वडील फारंच खंगल्यावरही कळवलं वृद्धाश्रम प्रशासनानं आणि भेटायलाही या म्हणून सांगितलं वडीलांच्या वतिनं. मुलांचा रिस्पॉन्स नाही. वडीलांची शास्वती राहिली नाही म्हणूनही सांगून झालं एकदाचं.वाट बघून अखेर वडील गेले, घोकुन घोकुन मुलाला आणि नातवंडांना पाहण्याची आशा डोळ्यात घेऊन. कळवलं प्रशासनानं अमेरीकेतल्या मुलाला तरी आले नाहीत कुणीच अगदी अंत्यविधीसाठीही.अखेर आश्रमाच्याच वतिने उरकला अंत्यविधी आणि नंतरचे सगळे सोपस्कारही पार पडले. वृत्तपत्रात मी ही बातमी वाचली आणि दिवसभर करमलं नाही. अगतीकता टोकाला पोंचली. कृतघ्नता इत्यक्या टोकाला पोंचलीय की तिला बाप गेल्याचंही दिसंत नाही. काळजांचे मांज-या खडक झालेत. या महापातकाने मला भाकर गोड लागली नाही. मी आमच्या महाविद्यालयाच्या सगळ्याच वर्गांनी हे वाचावं आणि त्यावर कांही लिहावं बोलावं म्हणालो वर्गा वर्गात लेकरांना आणि आपणा वाचकांशीही कांही शेअर करावंच म्हटलं या भावना आपल्या डोळ्यादेकत घडत चाललेल्या व्यवहारी जगाच्या भावनाशून्यतेबद्दल.

### दोन

ही दुसरी बातमीही वृत्तपत्रातच वाचली होती. मुलगी अहमदनगरला ब-या घरी दिलेली आई-वडीलांनी काबाडकष्ट करुन. ती ही उच्चशिक्षीतच. आई दुखन्यानं बेजार असल्याचं कळवलं तिला पण शेजा-यांनी. तिला निदान माय मिडकायलीय,येवून जा म्हणूनही सांगून झालं.अखेर आई गेली रात्री आणि भावकीनं आई गेल्याचंही कळवलं. मुलगी आली तर नाहीच कळस म्हणजे तीनं मोबाईलवर आईचं अंत्यदर्शन करवून देण्याची आणि रक्षा कुरीयरनं पाठवण्याची विनंती केली.अर्थात सासरी आहे आणि तिची अगतीकताही आपण समजू शकतोच.तिचं बोलणं ऐकून लोक चिडले आणि "तू नाही आलीस तरी चालतंय बाई" म्हणून दुस-या दिवशी सकाळी अंत्यसंस्कार उरकून टाकला.परीसर हळहळला. चर्चेला ऊत आला. पेपरातही छापून आले वृतांत. शिक्षण,माणुसकी,दया,मया अशा कितीतरी अंगांनी चर्चा झडल्या.काय होत चाललंय भवतालात काही कळायला मार्ग नाही. नेमक्या कुठल्या दिशेनं जातो आहोत आपण ? शिकल्या-सवरल्या माणसांकडून याच होत्या का अपेक्षा ? हे शिकलेले बरे की ते न शिकलेले, ज्यांच्या काळजातला ओलावा अजून तग धरुन आहे. अजून तरी कुण्या गरीबानं, अशिक्षीतानं, मजुरानं, शेतक-यानं, गोर-गरीबानं माय-बाप घराबाहेर काढल्याचं, आश्रमात ठेवल्याचं बघण्यात, ऐकन्यात, वाचन्यात आलं नाही. माया-ममता-जिव्हाळा या बाबी खरंच गौण आहेत का शिकलेल्या लोकांच्या लेखी ? कुटुंब संस्थांची स्थापना करण्या मागच्या प्रमुख कारणांमध्ये हे ही एक प्रमुख कारण होतं. पण आज कुटुंबांचे आकार आणि गरजा पाहता कांही गौष्टी किती गौण ठरंत चालल्या आहेत ? आई -बाप,आज्जी-आजोबा,मामा-मामी, काका -काकी, आत्या-मामा या नात्यांमधील ओलावा पार वाळून गेलाय की काय ही शंका येते आहे.पुर्वी सारखं कांहीच राहिलं नाही म्हणून कसं होता येईल मोकळं आपल्याला ?

विज्ञानाच्या प्रगतीने जगणं नेमकं सोपं केलंय की अवघड, कळायला मार्ग नाही. सगळ्या सुख-सोई दाराशी लोळंण घेत असताना आई-बाप अडगळ वाटावेत आपल्याला हे प्रचंडच दुःखदायी आहे. ही दोन उदाहरणं आणि भवतालात आपल्याला माहीत असलेली अशी किती तरी उदाहरणं या माझ्या भावना मोकळ्या करण्यामागे आहेत. विज्ञानाने रुजवलेली ही वस्तुनिष्ठता आज इतक्या टोकाला जाईल असं स्वप्नातही वाटलं नसेल कुणालाच. नाळेच्या अंगानं पार वाळंत चाललोईत आपण ! ही कविता तशी मागेच कधी तरी अशाच प्रसंगांनी माझ्याकडून लिहून घेतलेली. या दोन घटनाही तशा कमी अधीक फरकानं जुन्याच परंतू पुन्हा नजरेसमोर तरळून गेल्या.

चला माय-बाप जपू
पैसा पैसा करुनिया काय लागले गा हाती ?
गेला घोकुनिया बाप नाही सापडली माती.
येना दिलेल्या मायीची नाही ऐकू आली हाक,
गळाटल्या बापाकडं सदा केली डोळेझाक.
नातवांची आजोबांशी नाही गाटभेट होत,
नाही भरण-पोषण, कसा सुधरावा पोत ?
आभाळाचा मातीशीही गेला संवाद सरुन,
डोळे लागले कपारी, कसा येईल भरुन ?
माय-बाप गेल्यावर कशासाठी काशी, गया ?
पुन्हा जगाला दावाया काय कामाची ही मया ?
काय करायाचा सांग तुझा सोनियाचा धूर,
रोज मायीच्या डोळ्याला इथं आसवांचा पूर.
लाख पगार आसंल तुला आरामाची गाडी,
काय फुकायाची सांग तुझी हवेशीर माडी ?
लाज वाटु द्या मनाला चला थोडं तरी खपू,
आता तरी आपापले चला माय-बाप जपू.

**(लेखक मराठी भाषेचे सुप्रसिद्ध साहित्यिक तथा इंग्रजी साहित्याचे संशोधन मार्गदर्शक आहेत)**


# चिंतनीय ग्रंथ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मराठवाडा

आधुनिक केसरी

**'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मराठवाडा' हा डॉ.सुधाकर नवसागर यांचा चिंतनीय असा ग्रंथ आहे हे प्रथमतः नोंदविले पाहिजे. कारण आजपर्यंत या विषयाला विस्तृत असा हात कोणी घातलेला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाडा विभागास दिलेला वेळ आणि केलेलं कार्य हे फार महत्त्वाचे आहे. शिवाय डॉ. बाबासाहेबांनी मराठवाड्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. शैक्षणिक क्षेत्रामध्ये मराठवाड्याच्या विकासाला चालना देण्याचे यथोचित कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दूरदृष्टीतून झालं हे नाकारता येत नाही.**

## परीक्षण

डॉ. दैवत सावंत
औरंगाबाद




तत्कालीन कालखंडातली प्रस्थापित व्यवस्था आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संघर्ष सर्वांना सर्वश्रुत आहे ;मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर येथे यत्किंचितही न डगमगता मराठवाड्याच्या विकासाला प्राधान्य देताना दिसतात.त्याचीच फलश्रुती म्हणून 1950 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी औरंगाबाद शहरातील नागसेन वनामध्ये मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली आणि तिथून पुढे खऱ्या अर्थाने या मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासाला गती प्राप्त झाली आहे. आणि यानंतर तब्बल आठ वर्षांनी 'मराठवाडा विद्यापीठ' स्थापन होते.यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दूरदृष्टी किती समाजहिताव आहे हे आपल्या लक्षात येईल. बाबासाहेबांनी आपल्या अनुयायाला दिलेला मूलमंत्र ही मला महत्त्वाचा वाटतो. त्याचाच एक भाग शैक्षणिकता आहे हे आपल्या लक्षात येईल.बाबासाहेब असे म्हणतात 'शिका ,संघटित व्हा आणि संघर्ष करा' या तत्त्वात, विचारात प्रथमता 'शिका' हा शब्द बाबासाहेबांनी वापरला आणि तो आजही समाजव्यवस्थेला लागू पडतो आहे. इतकं सक्षम आणि सूक्ष्म चिंतन बाबासाहेबांचं होतं.मला वाटतं बाहेरून येऊन( मुंबई, मध्यप्रदेश) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मराठवाडा विभागामध्ये शैक्षणिक संकुल सुरू करण्याची दूरदृष्टी आहे ती अफलातूनच म्हणावी लागेल. अशा अनेक गोष्टी आहेत त्या मराठवाड्याच्या हितासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केल्या आणि म्हणून हाच विषय केंद्रस्थानी ठेवून मराठवाड्यातील महत्त्वाचे अभ्यासक ,संशोधक डॉ. सुधाकर नवसागर यांनी 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि मराठवाडा' या विषयावर प्रदीर्घ चिंतन केले आणि हा आज ग्रंथ सिद्ध झालेला आहे. या ग्रंथाचे डॉ.सुधाकर नवसागर यांनी 18 प्रकरणात वर्गीकरण केले. बाबासाहेबांनी ज्या ज्या बाबी मराठवाड्याच्या भूमित केल्या त्याची ऐतिहासिक मांडणी या निमित्ताने एका पुस्तकात होते आहे. खरंतर या स्वरूपाचे पुस्तक किंवा ग्रंथ यापूर्वीच येणे अपेक्षित होता आणि काही अंशी विखुरलेल्या स्वरूपात का? होईना पण तो प्रयत्न झालेला आहे. मात्र एकाच ग्रंथामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाड्याच्या विकासात दिलेले योगदान किंवा केलेले नानाविध स्वरूपाचे कार्य या ग्रंथामध्ये आपल्याला वाचता येतील. कोणत्याही प्रकारचा आवेश न आणता अगदी साधी, सरळ मांडणी डॉ. नवसागर करतात. आणि या ग्रंथाला एक वेगळं परिमाण प्राप्त होते. वाचकाला हा ग्रंथ खिळवून ठेवतो. सर्वांनी हा ग्रंथ संग्रही ठेवावा असा हा ग्रंथ आहे, असं आपल्याला म्हणता येईल.इतकी महत्वपूर्ण लेखणी यात समाविष्ट आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मराठवाड्याच्या संबंधीचे काम विशाल आहे.त्यांनी जर या ठिकाणी विकासाभिमुख कार्य केले नसते तर आज महाराष्ट्रामध्ये मराठवाडा विभाग आहे, त्यापेक्षा अतिशय मागास राहिलेला असता याची जाणीव आपल्याला आहे. डॉ.सुधाकर नवसागर यांनी आपल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मराठवाडा 'या ग्रंथात बाबासाहेबांनी सुरू केलेल्या मिलिंद महाविद्यालयाच्या संदर्भापासून ते मराठवाड्याच्या विकासामध्ये दिलेलं महत्त्वपूर्ण वेगवेगळ्या ठिकाणचं योगदान सदर ग्रंथात अधोरेखित केलेले आहे. आजपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाड्याच्या संबंधी जो विचार केला.तो विचार अनेक ग्रंथांमध्ये विखुरलेल्या स्वरूपात आणि सारांश रूपांनी मांडणीच्या माध्यमातून आपल्यासमोर आलेला आहे; मात्र या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मराठवाडा या संबंधीच्या परिपूर्ण रूपाने आपल्यासमोर येतो. तेव्हा साहजिकच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठवाड्याच्या विकाससंबंधी लक्ष दिल नसतं तर या निजामी राजवटी खाली राहिलेल्या मराठवाड्याचा विकास झाला असता का? हा एक प्रश्न आपल्यासमोर उभा राहतो. याच विचाराला धरून डॉ. नवसागर लेखन करतात. तेव्हा सहज सर्वसामान्य वाचक बाबासाहेबांच्या दूरदृष्टीचा विचार करू लागतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मराठवाडा 'या महत्त्वपूर्ण ग्रंथात निजामकालीन दलितांची अवस्था, मराठवाड्यातील आंबेडकरपूर्व दलित चळवळ, आंबेडकर पूर्व मराठवाड्यातील सत्यशोधक चळवळ, बाबासाहेबांचा मराठवाड्याला पहिला स्पर्श ,धर्मांतराची घोषणा आणि मराठवाडा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बी.एस व्यंकटराव, हैदराबाद संस्थानातील आंबेडकर चळवळीत फूट, भाऊसाहेब मोरे यांच्या नेतृत्वाचा उदय, आंबेडकरी क्रांतीचा ओनामा : मकरंदपूर परिषद, देशातील पहिला जमीन सत्याग्रह मराठवाड्यात ,कसबे तडवळे वतनदार महार-मांग परिषद, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि हैदराबाद मुक्तीलढा ,स्टेट कॉंग्रेसच्या लढ्यातही अस्पृश्य, भाषावार प्रांतरचना आणि स्वतंत्र मराठवाड्याची मागणी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मराठवाड्यातील शैक्षणिक कार्य, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अपूर्ण योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि औरंगाबाद शहर आणि परिशिष्टांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची औरंगाबाद मधील छायाचित्रे या प्रकारच्या लेखणीला प्राधान्य देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाड्याच्या संदर्भामध्ये आपल्या संपूर्ण हयातीत जे महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे,ते योगदान डॉक्टर सुधाकर नवसागर अगदी विस्तृतपणे मांडताना दिसतात. या ग्रंथाला प्रा. दत्ता भगत सरांची मोजकीच पण महत्त्वाची पाठराखण आहे. ते नोंदवतात "मराठवाड्याच्या संदर्भात बाबासाहेबांनी केलेले शैक्षणिक कार्य, भूमिहीनांचा प्रश्न, मराठवाड्याची भाषिक अस्मिता आणि मुस्लिम धर्मांध चळवळीला दिलेले प्रखर उत्तर या सर्व गोष्टींचा वापर या ग्रंथात केलेला आहे. एवढेच नाही तर आपल्या कायद्याच्या ज्ञानाधारे बाबासाहेब आंबेडकरांनी हैदराबाद संस्थानाचा विलीनीकरणाचा राजकीय पेच सोडून भारताला संकटमुक्त केले या विषयीचे विवेचन हे या ग्रंथातले बलस्थान आहे' या भगत सरांच्या मतानुसार आणि पाठराखणीने हा ग्रंथ किती महत्त्वपूर्ण आहे, याची आपणास कल्पना येते.यापुढेही डॉ. सुधाकर नवसागर हे आपले बाबासाहेब आंबेडकर आणि मराठवाडा या संबंधीचे, विषयीचे चिंतन पुढे चालू ठेवतीलच. परंतु हा ग्रंथ विचार दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण आहे, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.लेखकाकडून वाचक नक्कीच अशा सकस लेखनाची पुढील काळात आशा ठेवतील यात शंका नाही.

# उलगुलान : मुंडा मुक्ती आंदोलन!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883


आधुनिक केसरी

**क्रांतिवीर भ. बिरसा यांच्या आंदोलनाची ब्रिटिशांना गंभीरपणे दखल घ्यावी लागली. सन १९०२मध्ये ब्रिटिशांनी छोटा नागपूर टेनन्सी अ‍ॅक्ट मंजूर करून आदिवासींचे जमिनीवरील हक्क मान्य केले. आदिवासींचे हक्क, स्त्री-स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा यांच्यासाठी लढा देणारा पहिला आदिवासी नेता म्हणून क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांची ओळख आहे. रांची येथील डिस्टिलरी पुलाजवळ त्यांची समाधी असून तेथे त्यांचा पुतळा उभारला आहे. तसेच त्यांच्या स्मृती नेहमी ताज्या रहाव्यात यासाठी रांची येथील केंद्रीय कारागृहास आणि आंतरराष्ट्रीय विमानतळास त्यांचे नाव देण्यात आले आहे. जयंती निमित्त त्यांच्या जीवनकार्यावर टाकलेला हा प्रकाशझोत.**

सन १८५७च्या क्रांतीनंतर इंग्रजांनी छोटा नागपूर प्रदेशातील मुंडा जमातींच्या शेतजमिनी हिरावून घेतल्या होत्या. त्या परत मिळविण्यासाठी मुंडांचे प्रमुख ज्यांना सरदार म्हटले जात, त्यांनी इंग्रजांविरुद्ध संघर्ष सुरू केला. तो संघर्ष सरदारी लढाई म्हणून प्रसिद्ध झाला. या आंदोलनात्मक लढाईचा भगवान बिरसांच्या मनावर मोठा प्रभाव पडला होता. त्यांनी इंग्रजांच्या गुलामीत असलेल्या आदिवासी समाजाला मुक्त करण्यासाठी क्रांतिकारक चळवळीला सुरुवात केली. त्यामुळे अनेक मुंडा जमातींनी त्यांच्यासोबत सरदार आंदोलनात सहभाग घेतला. त्यांनी चालविलेले व्यापक आंदोलन दडपण्यासाठी इंग्रजांनी दोन नियम-अटी लागू केले होते- १) इंग्रजांनी अनेक ठेकेदारांना दारूचे अड्डे चालविण्यासाठी परवाने दिले. अशिक्षित मुंडा आदिवासी नेहमी दारूच्या नशेत राहून ते आंदोलनापासून अलिप्त राहतील, असा त्यांचा हेतू होता. भगवान बिरसांनी या नियमांना विरोध करत इंग्रजांविरुद्ध आवाज उठविला. आदिवासी बांधवांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. २) गावागावांत जेवढ्या आदिवासींच्या जमिनी आहेत, त्यांवर सरकारी वनाधिकाऱ्यांचा अधिकार आहे. या नियमामुळे मुंडा लोकांचा जगण्याचा अधिकार हिरावला जाऊन समाजाचे नुकसान होणार होते.

क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा हे आदिवासी समाजक्रांतीचे जनक व एक स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांचा जन्म दि.१५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंडमधील उलिहातू या छोट्याशा खेड्यात झाला. त्यांचे वडील सुगना व आई करमी हे होत. जन्म गुरुवारी म्हणजे बिस्युतवार किंवा बृहस्पतिवार या दिवशी झाला, म्हणून त्यांचे नाव बिरसा ठेवण्यात आले. त्यांच्या कुटुंबाची परिस्थिती हलाखीची होती. त्यामुळे त्यांच्या जन्मानंतर सर्व कुटुंब उदरनिर्वाहासाठी त्यांची आत्या दासकीर हिच्या आयुभातू या गावी गेले. बासरी व टुईला वाजविणे, नृत्य, नकला, चित्र रेखाटणे, आखाड्यात जाणे इत्यादी छंदही त्यांच्या अंगी होते. मुंडांना शिक्षणाची खुप आवड होती. सुरुवातीला ते आयुभातूजवळ सलगा गावच्या आश्रमात जात. ते आश्रम जयपाल नाग हा आदिवासी व्यक्ती चालवित होता. पुढे सन १८८६ मध्ये बिरसांचे मोठे भाऊ कानु यांनी त्यांना जर्मन ईसाई मिशन स्कूलमध्ये दाखल केले. तत्पूर्वी शाळेच्या अटीनुसार त्यांना ख्रिश्चन धर्म स्वीकारावा लागला. शाळेमध्ये जर्मन लुथेरियन मिशनचे अध्यक्ष फादर नोट्रोट यांनी भाषणात मुंडा आदिवासींबद्दल ठग, चोर, बेइमान इत्यादी शब्दांचा वापर केला. तेव्हा त्यांनी फादर नोट्रोट यांना खडसावून प्रत्युत्तर दिले. त्यामुळे सन १८९० या चौथ्याच वर्षी बिरसांना शाळेतून काढण्यात आले. पुढे त्यांनी शिक्षणासाठी अंगीकारलेल्या ख्रिश्चन धर्माचा त्याग केला. उदरनिर्वाहासाठी ते चार वर्षे बांदगाव येथे वास्तव्यास होते. त्यांचा विवाह हिरीबाई नामक मुलीशी झाला; परंतु अल्प काळातच तिचे निधन झाले. त्यांनी आनंद पांडे या वैष्णव पंथीयांकडून धार्मिक शिक्षण घेतले. हे शिक्षण घेत असताना मुंडा जमातीच्या परंपरागत जीवनपद्धतीमध्ये, धर्मामध्ये परिवर्तन व सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांच्या लक्षात आले. हिंदू, ख्रिश्चन व मुंडा आदिवासी या धर्मांतील चांगली तत्त्वे एकत्रित करून नव्या बिरसाईट धर्माची स्थापना केली. यासाठी त्यांनी लोकसंघटन करून मुंडा जमातीत एकता निर्माण केली. ईसाई धर्म हा विदेशी असल्यामुळे तो आपल्या पूर्वजांच्या परंपरेला कलंकित करणारा आहे, अशी लोकजागृती ते करू लागले. त्यामुळे ते भगवान बिरसा म्हणून ओळखले जाऊ लागले.

सन १८९४मध्ये आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडला होता. इंग्रजांकडून कोणतीही मदत मिळत नव्हती. उलट, इंग्रजांनी आदिवासींकडून जमीन महसूल ठरावीक




तारखेलाच रोख स्वरूपात भरण्याची सक्ती केली. त्यामुळे अनेकांना आपल्या जमिनी सावकार आणि जमीनदार यांच्याकडे गहाण ठेवाव्या लागल्या. भरमसाठ व्याजदरांमुळे तारण ठेवलेल्या जमिनी सोडवून घेणे, त्यांना अशक्य बनले. जमीनमालकी असणारे लोक भूमिहीन व वेठबिगार बनले. त्यामुळे बिरसांनी इंग्रजांविरुद्ध आदिवासी तरुण बांधवांचे संघटन केले. समाजबांधवांनी एकत्र येऊन धोकेबाज इंग्रजांना यमसदनी पाठवावे. त्यामुळे आपले राज्य येईल, असे ते सांगत. त्यांच्या शब्दांमुळे अनेक मुंडांनी ठेकेदार व इंग्रजांच्या कामास जाणे बंद केले. इंग्रजांपेक्षा आपण बलाढ्य कसे आहोत? हे सांगून ते समाजामध्ये नवचेतना निर्माण करीत. त्यांनी स्वराज्याची घोषणा करून इंग्रज शासनापुढे सशक्त आव्हान निर्माण केले. त्यामुळे इंग्रज शासनाने त्यांना बंदी करण्याचे ठरविले. ब्रिटिशांनी दि.२६ ऑगस्ट १८९५ रोजी भ.बिरसा व त्यांच्या सहकाऱ्यांना पकडले. त्या सर्वांच्या अटकेमुळे पुन्हा मुंडा समाजात इंग्रजांविरुद्ध असंतोष निर्माण झाला. अखेर दि.३० नोव्हेंबर १८९७ रोजी बिरसांची सुटका झाली. तुरूंगातून सुटल्यानंतर भगवान बिरसांनी सेवादलाची स्थापना केली. गावोगावी गुप्त बैठका घेऊन मुंडाराज्य स्थापन करण्याच्या शपथा घेण्यात आल्या. त्यामध्ये सुमारे पाच हजार आदिवासी समाजबांधव सामील झाले होते. त्यांनी कायद्याची लढाई सोडून दि.२५ डिसेंबर १८९९पासून इंग्रज अधिकारी, इंग्रजधार्जिणे ठेकेदार, जमीनदार, सावकार व ख्रिश्चन धर्मप्रसारक यांच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेत प्राणघातक हल्ले करण्यास सुरुवात केली. सिंगभूम, चक्रधरपूर, रांची, खुंटी, कोरा, तामाड आदी प्रदेशांतील पोलीस चौक्या जाळण्यात आल्या. या मुक्ती आंदोलनाला मुंडारी भाषेत उलगुलान असे म्हणतात. या आंदोलनात आदिवासींनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. पोलिसांच्या गोळीबारात व मुंडांच्या तिरकामठ्यांद्वारे हजारो पोलीस व त्यांचे सहकारी मारले गेले. अखेर भ.बिरसांना शह देण्यासाठी इंग्रजांनी कूटनीतीचा वापर केला. त्यांना जो कोणी पकडून देईल त्याला इंग्रजांकडून पाचशे रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते. पैशाच्या लालसेपोटी मनमारू व जवाईकेला या गावातील काही युवकांनी भ.बिरसा जंगलात असल्याची बातमी इंग्रजांना दिली. त्यामुळे ते दि.३ फेब्रुवारी १९०० रोजी बिरसांना पकडू शकले. रांची येथे कैदेत असताना इंग्रजांनी त्यांचा अतोनात छळ केला. तेथेच त्यांचे दि.९ जून १९०० रोजी निधन झाले.

!! जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या समाजक्रांतीला मानाचा मुजरा !!

# बालदिन : मुलांना त्यांच्या हक्कांचे ज्ञान देण्यासाठी सुरु केलेला दिवस

नेहरूजींना लहान मुले फार प्रिय होती. मुलेही त्यांना प्रेमाने 'चाचा' म्हणत. भारताशिवाय इतर अनेक देशांमध्येही मोठ्या प्रमाणात आणि उत्साहात बालदिन साजरा केला जातो. पहिल्यांदा 'आंतरराष्ट्रीय बाल दिन' साजरा करण्याची कल्पना 1857 मध्ये अमेरिकेतील मॅसॅच्युसेट्स येथील डॉक्टर चार्ल्स लिओनार्ड यांना सुचली. त्यांनी ठरवलं की जून महिन्याच्या दुसऱ्या रविवारी बालदिन साजरा करायचा. त्याला त्यांनी 'रोझ-डे' असे नाव दिले. नंतर त्याचे नाव 'फ्लॉवर-डे' ठेवण्यात आलं आणि शेवटी 'बालदिन' असे नामकरण झाले. लहान मुलांसाठी राष्ट्रीय सुट्टी जाहीर करणारा तुर्की प्रजासत्ताक हा पहिला देश ठरला. फार पूर्वी 1920 मध्ये त्यांनी 23 एप्रिल हा बालदिन म्हणून घोषित केला. यानंतर 1925 मध्ये जिनेव्हा येथे पहिल्यांदाच संपूर्ण जगासाठी बालदिन निश्चित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. येथील 'वर्ल्ड कॉन्फरन्स ऑन चाइल्ड वेल्फेअर' या कार्यक्रमात तसा प्रस्ताव ठेवण्यात आला. त्यानंतर 4 नोव्हेंबर 1949 रोजी रशियातील वुमन्स इंटरनॅशनल डेमोक्रॅटिक फेडरेशनने ठरवले की 1 जून हा दिवस 'मुलांच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय दिवस' म्हणून साजरा केला जाईल. तेव्हापासून, बहुतेक कम्युनिस्ट देशांमध्ये 1 जून हा बालदिन म्हणून साजरा केला जातो.

1954 मध्ये पहिल्यांदाच युनायटेड किंग्डमने जगातील सर्व देशांमध्ये एकाच दिवशी एकत्रितपणे 'बालदिन' साजरा करण्याचा प्रयत्न केला. शेवटी 20 नोव्हेंबर 1959 रोजी संयुक्त राष्ट्रसंघाने 'डिक्लेरेशन ऑफ द राइट्स ऑफ द चाइल्ड' चा स्वीकार केला आणि दरवर्षी 20 नोव्हेंबर रोजी जागतिक बालदिन साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासून दरवर्षी




20 नोव्हेंबर रोजी 'जागतिक बालदिन' साजरा केला जातो.1959 साली झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत बाल हक्कांची घोषणा सुद्धा करण्यात आली होती. हे बालहक्क चार वेगवेगळ्या भागांत विभागलेले असून त्यामध्ये जीवनाचा हक्क, संरक्षणाचा हक्क, सहभागाचा हक्क आणि विकासाचा हक्क यांचा समावेश आहे. असे बरेच देश आहेत, जेथे वेगवेगळ्या दिवशी बालदिन साजरा करण्यात येतो. काही देशांमध्ये एक जून, चीनमध्ये 4 एप्रिल, पाकिस्तान 1 जुलै तर अमेरिकेत जून महिन्याच्या दुसऱ्या रविवारी बालदिन साजरा करण्यात येतो. याशिवाय ग्रेट ब्रिटन मध्ये 20 ऑगस्ट, जपानमध्ये 5 मे या दिवशी बालदिन साजरा होतो. असे सर्व असूनही अजूनही बहुतेक देश स्वतःचा बालदिन साजरा करतात, जसे की न्यूझीलंडमध्ये मार्चच्या पहिल्या रविवारी आणि जपानमध्ये 5 मे रोजी बालदिन साजरा केला जातो. आजही 50 हून अधिक देश 1 जून रोजी बालदिन साजरा करतात. यापैकी अमेरिका हे पुढारलेले राष्ट्र दरवर्षी जूनच्या दुसऱ्या रविवारी बालदिन साजरा करते. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू लहान मुलांवर खूप प्रेम करत. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर त्यांच्या जन्मदिवशी म्हणजेच 14 नोव्हेंबर रोजी देशभर 'बालदिन' मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मुलांचे काळजीपूर्वक आणि प्रेमाने पालन पोषण केले पाहिजे, कारण ही लहान मुलेच देशाचे भविष्य आणि उद्याचे नागरिक होणार आहेत, तीच देशाचे सामर्थ्य आणि समाजाचा पाया आहेत, असे नेहरू यांचे म्हणणे होते. त्यांचा जन्म अलाहाबाद येथे झाला होता. पहिल्यापासूनच त्यांना छोट्या मुलांबद्दल खूप प्रेम वाटत असे. मोठेपणी त्यांच्या कोटाच्या पहिल्या बटनावर एक गुलाबाचे सुंदर फूल विराजमान झालेले दिसे. 'फूल व मूल' हीच त्यांची मोठी आवड होती. लहान मुले म्हणजे नेहरूंच्या हृदयातील अमूल्य ठेवा होता. मुले हीच खरी राष्ट्रीय संपत्ती आहे, या दृष्टीकोनातून नेहरुंनी आपल्या विकास कार्यक्रमात बाल कल्याणाच्या उपक्रमांना नेहमीच अग्रक्रम दिला होता. मुले काय शिकतात यापेक्षा त्यांच्यावर कोणते संस्कार होतात हे पालक आणि शिक्षकांनी पाहिले पाहिजे याबाबत ते सदैव आग्रही असत. 'मुले व फुले' याबद्दलचा जिव्हाळा नेहरूंच्या रोमारोमात भिनलेला होता. एकदा तर होळीच्या दिवशी त्यांच्या निवासस्थानी शाळकरी मुले आली आहेत हे कळताच मंत्रिमंडळाच्या बैठकीतून उठून ते तडक घरी गेले आणि मुलांवर रंग उधळण्यासाठी त्यांच्या दिशेने धावले. मुठी भरभरून त्यांनी त्या आलेल्या मुलांवर रंग उधळला. परंतु आपल्यावर रंग उधळण्यास मुले संकोच करत असल्याचे त्यांना जाणवले. म्हणून ते खाली बसले व म्हणाले, सांगा बघू. आता, आता मी मोठा वाटतो का? झालो की नाही लहान तुमच्या एवढा छोटा ! चला आता उडवा पाहू माझ्यावर रंग!" असे होते हे चाचा नेहरू ! आपले वय, पद सर्वकाही विसरून ते लहान मुलांमध्ये त्यांच्यासारखे लहान होऊन मिसळत व त्यांच्यात रमून जात. 27 मे 1964 रोजी नेहरूंचे निधन झाले.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे

आधुनिक केसरी

थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांचा आज ४० वा स्मृतिदिन. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्राह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली.

**-श्याम बसप्पा ठाणेदार, ९९२२५४६२९५**

# भारत जोडो यात्रेत आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले केरळचे 'बँड पथक'

## लष्करी शिस्तीतील तालबद्ध संचलनाने यात्रेचा उत्साह वाढला

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** लष्करी संचलनाप्रमाणे बिगुल, कवायतीची धून, ताशाचा कडकडाट आणि त्या तालावर अत्यन्त शिस्तबद्ध रीतीने 'लेफ्ट-राईट- लेफ्ट' करत जाणारे "स्वर्गधारा बँड पथक" भारत जोडो यात्रेत आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. यात्रेत या 14 जणांच्या बँड पथकाला निश्चित असे स्थान आणि ओळख आहे. सर्वात पुढे या पथकाचे संचलन असते आणि मागे त्याच तालावर पाऊले टाकत यात्रा चालते. धून कानावर येताच राहुल गांधी यांची पदयात्रा जवळ आल्याचे गावागावात, चौकात उभ्या लोकांना कळते. हे बँड पथक केरळ मधील स्वर्गधारा चॅरिटेबल ट्रस्टचे आहे. अनेक सार्वजनिक व खाजगी समारंभ ते करतात. त्यातून मिळणारे उत्पन्न पथकातील कर्मचाऱ्यांचे पगार आणि शिल्लक रक्कमेतून गोरगरीब मुलांना शिक्षण, गरजूसाठी वैद्यकीय मदत दिली जाते. नौदलाच्या बँड पथकाच्या धर्तीवर या पथकाला खास प्रशिक्षण देण्यात आले आहे. निवृत्त नौदल अधिकारी सिनोय यांनी पाच महिने लष्करी शिस्त आणि संचलनाचे धडे दिले आहेत. नौदलाप्रमाणे सफेद गणवेश, काळे बूट आणि दंडक घेऊन संचलनाचे नेतृत्व करणारा कॅप्टनही आहे. कॅप्टनसह प्रमूख दोन वादक असे तिघेजण संपूर्ण यात्रेसोबत असतील तर उर्वरित सदस्य दर महिन्याला बदलले जातात. आतापर्यंत दोन वेळा सदस्य बदलले आहेत. लांबचा पायी प्रवास आणि सतत वाद्य वाजवत शिस्तबद्ध संचलन केल्याने शरीरावर प्रचंड ताण येत असतो, त्यामुळे यात्रेसाठी एकूण 30



जणांचे नियोजन केले आहे, असे पथकाचे प्रमुख समीर के. यांनी सांगितले. पहाटे साडेपाच वाजता पदयात्रा सुरू होण्याच्या स्थळी ते तयार असतात. काही क्षणातच राहुल गांधी दाखल होतात. मग "सारे जहाँ से अच्छा.... " या धूनने सलामी दिली जाते आणि पदयात्रेला सुरूवात होते. तर "जन गण मन..." या राष्ट्रगीताच्या धूनने यात्रेला अल्पविराम मिळतो. यात्रा महाराष्ट्रात दाखल झाल्यानंतर दोन वेगवेगळ्या ठिकाणी दोन यात्रेकरूंचे निधन झाले. त्या दिवशी श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि दुखवटा पाळण्यासाठी बँड पथकाचे संचलन बंद ठेवण्यात आले होते. कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंत चालणाऱ्या 150 भारतयात्रींसोबत, राहुल गांधी यांचे अंगरक्षक, सीआरपीएफचे जवान, त्यांच्या भोवती राज्य पोलिसांचे 'डी' आकारातील सुरक्षा कड्यातील पोलीस पथक, यात्रेचे व्यवस्थान बघणारी दिल्लीची अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची विशेष टीम आणि त्यांचे खास फोटोग्राफर, यांच्यासह हे बँड पथक सुद्धा न थकता आणि न थांबता मार्गक्रमण करत आहे.



# रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयी सुविधांचा विकास योजना 2020-21 अंतर्गत धुळे शहरात विविध कामांसाठी नगर विकास विभागाकडून आ.फारुख शाह यांच्या प्रयत्नाने पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. शहरात विविध ठिकाणी रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तसेच देवपुर भागातील रस्त्यांची अत्यंत दुर्दशा झालेली आहे. यासाठी लाला सरदार नगर, व परीसरातील नागरीकांनी आमदार फारुख शाह यांच्याकडे रस्त्यासंदर्भात निवेदन दिलेले होते. त्या निवेदनाची आमदार फारुख शाह यांनी तत्काळ दखल घेत निधी मंजुर करून आणला व आज आमदार फारुख शाह यांचे बंधु भिकन हाजी साहेब यांच्या हस्ते रस्त्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळेस तेथील स्थानिक नागरीकांनी आमदार फारुख शाह साहेबांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाला एम.आय. एम.जिल्हाध्यक्ष नासिर पठाण, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष डॉ.दिपश्री नाईक, शहराध्यक्षा फातेमा अन्सारी, नगरसेवक गनी डॉलर, माजी नगरसेवक साजिद साई, सादिक शाह, निसार अन्सारी, शरीफ शेख, युनूस शेख, गनी शेख, कैसर अहमद, हालिम शमसुद्दिन, रिझवान अन्सारी, शहजाद अहमद, समीर बेग, समीर शाह, वसिम पठाण, मुजाहिद् मिर्झा, जमील मिर्झा, अल्ताफ शेख इ. उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूचक गनी डॉलर, व आयोजक - अकीब अली,जुबेर शेख हे होते.

# बंदुकीचा धाक दाखवत ढकांबे येथे दरोडा

## २८ तोळे सोन्यासह १७ लाख ३४ हजारांचा ऐवज लंपास

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील ढकांबे शिवारातील आशेवाडी रस्त्यालगत रतन शिवाजी बोडके यांच्या घरी अज्ञात चोरट्यांनी बंदुकीचा धाक दाखवून 28 तोळे सोने व साडे आठ लाख रुपये रोख रक्कम असे एकुण 17 लाख 34 हजारांचा ऐवजांचा धाडसी दरोडा टाकल्याने एकच खळबळ उडाली आहे. ढकांबे येथे आशेवाडीला जाणाऱ्या रस्त्यालगत मानोरी शिवारात गट नंबर 40/3 मध्ये रतन शिवाजी बोडके यांच्या मालकीची शिवकमल नावाची दोन मजली इमारत आहे. रात्री दिड ते तीन वाजेच्या सुमारास 35 ते 40 वयोगटातील 6 सहा दरोडोखरांनी बंगल्याच्या खालच्या मजल्यावरील किचनच्या दरवाजावाटे बंगल्यात प्रवेश केला. हातात बंदुक व प्राणघातक शस्त्राच्या सहाय्याने धाक दाखवत जीवे ठार मारण्याची धमकी दिली. यावेळी




घरातील कपाटात ठेवलेले 28 तोळे सोने, व साडे आठ लाख रुपये रोख रक्कम असे एकुण 17 लाख 34 हजार 400 रुपयाचा इतका ऐवज घेवून रतन बोडके यांच्या मालकीच्या क्रेटा कार (क्र. एमएच 15 एचवाय 3053) मध्ये बसून दरोडेखोर फरार झाले. सदर कार नाशिक दिंडोरी रस्त्यालगत ढकांबे फाट्यावरील वाडा हॉटेलजवळ बेवारस लावून दरोडेखोर फरार झाल्याचे आढळून आले आहे. घटनेची माहिती समजताच पोलिस अधिक्षक शहाजी उमाप, उपअधिक्षक माधुरी कांगणे, कळवण उपविभागीय अधिकारी अमोल गायकवाड, नाशिक उपविभागीय अधिकारी अर्जुन भोसले, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील, दिंडोरीचे पोलिस निरीक्षक प्रमोद वाघ, वणी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक स्वप्निल राजपुत यांनी घटनास्थळी भेट दिली. यावेळी श्वान पथकाला पाचारण करुन दरोडोखोरांचा मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात आला या धाडसी दरोड्या बद्दल. अज्ञात दरोडेखोरांवर दिंडोरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास पोलिस अधिक्षक शहाजी उमाप, उपअधिक्षक माधुरी कांगणे, कळवण उपविभागीय अधिकारी अमोल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ सहाय्यक पोलिस निरीक्षक चेतन लोखंडे, पोलिस उपनिरीक्षक अरुण आव्हाड, पांडूरंग कावळे, अजय कवटे, हवालदार प्रमोद मुंढे, सुदाम धुमाळ, धनंजय शिलवटे, बाळासाहेब पजई आदी करीत आहेत.

# डॉ. दादा गोरे यांचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सत्कार, प्रकाशन समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्रसिद्ध लेखक, समीक्षक आणि



अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य डॉ. दादा गोरे हे दि. २३ नोव्हेंबर २०२२ रोजी अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहेत. यानिमित्ताने डॉ. गोरे यांचा विशेष सत्कार आणि त्यांच्या पुस्तकांचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला आहे. दि. २३ नोव्हेंबर २०२२ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता मराठवाडा साहित्य परिषदेच्या सभागृहात हा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार.

डॉ. गोरे हे विवेकानंद महाविद्यालयाचे प्रदीर्घकाळ मराठी विभाग प्रमुख होते. विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून त्यांची आजही ओळख आहे. त्यांनी विद्यापीठस्तरावरील विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्यादेखील सांभाळल्या आहेत. ते अकॅडमी कौन्सिलचे सदस्य, अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाचे निमंत्रक, तसेच विश्वकोशाचे अभ्यागत संपादकही राहिले आहेत. मागील सुमारे दीड दशकांपासून ते मराठवाडा साहित्य परिषद आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सक्रिय पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. डॉ. गोरे यांची ललित लेखक अशी ओळख असली तरी समीक्षक म्हणूनही त्यांची ख्याती आहे. शिवाय अनेक महत्त्वाची संपादनेही त्यांच्या नावावर आहेत. सत्कार समारंभाच्या दिवशी 'साहित्य आस्वाद आणि चिंतन', 'एकविसाव्या शतकातील मराठी कादंबरी', 'स्त्रियांचे समकालीन साहित्य' या तीन ग्रंथांसह 'वाङ्मयीन प्रवृत्ती तत्त्वशोध' या गौरवग्रंथाच्या नव्या आवृत्तीचे प्रकाशन संत साहित्याचे व्यासंगी अभ्यासक आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते होणार आहे. मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. तर ज्येष्ठ समीक्षक डॉ.ऋषिकेश कांबळे आणि डॉ. पी. विठ्ठल यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असेल.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. कैलास अंभुरे, कैलास पब्लिकेशनचे के. एस. अतकरे, संस्कृती प्रकाशनच्या संचालक सुनीताराजे पवार, अक्षर वाङ्मय प्रकाशनचे बाळासाहेब घोंगडे यांच्यासह डॉ. ललित अधाने, डॉ. रमेश रावळकर, डॉ. अनिरुद्ध मोरे, डॉ. शशीकांत पाटील, डॉ. गणेश मोहिते, डॉ. समाधान इंगळे यांनी केले आहे.

# धमकी देत भंगार गोळा करणाऱ्यास लुटले

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** भंगारचे सामान देतो म्हणून बोलावून घेत एकास लोखंडी रॉडने जीवे मारण्याची धमकी देत त्यांच्याकडून सत्तर हजार रुपये हिसकावून घेतल्याची घटना फुलंब्री शहरातील देवगिरी साखर कारखाना जवळ घडली. औरंगाबाद शहरातील भंगारचे व्यवसायिक शेख तय्यब शेख सलीम यांना देवगिरी साखर कारखाना समोर राहणाऱ्या कोंडीबा जाधव याने भंगारचे समान देतो म्हणून बोलावून घेत शेख तय्यब हे रिक्षा घेऊन आले असता तर यामध्ये कोंडीबा जाधव व त्याच्या तीन सहकाऱ्यांनी तय्यब शेख यांच्या रिक्षेत बसून तू रिक्षा पुढे घेऊन घे असे म्हणत वाणेगाव फाट्याजवळ घेऊन गेले व त्यांना लोखंडी रॉडचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी देत त्यांच्या जवळील रोख रक्कम 22 हजार रुपये सात हजार रुपये किमतीचा मोबाईल व तसेच शेख तय्यब शेख सलीम यांच्या बँक खात्यावर असलेले चाळीस हजार रुपये फोन पे च्या माध्यमातून दुसऱ्या इसमाच्या मोबाईल नंबर वर आरोपींनी पाठविले. त्यानंतर ते निघून गेले.

या प्रकरणी शेख तय्यब यांच्या तक्रारीवरून काल दिनांक 12 नोव्हेंबर रोजी कोंडीबा जाधव व त्याच्या तीन सहकारी आरोपी विरोधात फुलंब्री पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे त्यानंतर पोलिसांनी कोंडीबा जाधव यांना तत्काळ अटक करून केली यातील आणखी तिघे जण फरार आहेत त्यांचा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस तपास घेत आहेत.

# औराळा येथे होणार पाचवा तिफण कविता महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यात वाङ्मयीन चळवळ गतिमान व्हावी, नव प्रतिभावंतांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, उत्तमोत्तम कवी - लेखक घडावेत , त्यांची वाङ्मयीन जडघडण व्हावी या महत्वपूर्ण उद्देशाने त्रैमासिक तिफण, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद तालुका शाखा कन्नड यांच्या तर्फे दरवर्षी ग्रामीण भागात राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने राज्यस्तरीय कविता महोत्सव आयोजित करण्यात येतो. महोत्सवाचे हे पाचवे वर्ष आहे. या कविता महोत्सवात राज्यभरातील कवी, कवयित्री ,कवितेचे अभ्यासक, वाचक, विद्यार्थी सहभागी होतात. मान्यवर अभ्यासकांचे मार्गदर्शन नव कविंना मिळत असते. कन्नड तालुक्यात अनेक नवकवी पुढे येत असून सातत्याने लेखन करीत आहेत. या वर्षीचा तिफण कविता महोत्सव कन्नड तालुक्यातील औराळा येथे होणार आहे. संयोजन समितीच्या बैठकित हा निर्णय घेण्यात आला प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या मार्गदर्शना खाली बैठक ता. १० रोजी संपन्न झाली. औराळा या गावाला धार्मिक, ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे. औराळी गावात प्राचीन नाट्य परंपरा आजही सुरु आहे. कृषी क्षेत्रातही या गावचे महत्वपूर्ण योगदान आहे. स्व. औराळकर काका हे उत्तम कवी व वक्ते होते. त्यांनी तिनशे पन्नास पेक्षा अधिक कविता व काही पोवाडेही लिहिले आहे. येत्या जानेवारीतील पहिल्या आठवडयात हा कविता महोत्सव होणार असल्याचे कविता महोत्सवाचे मुख्य संयोजक डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे , डॉ. प्रकाश खेत्री ,प्रा. रमेश वाघचौरे , संदीप ढाकणें, ज्ञानेश्वर गायके, भिमराव सोनवणे, का. का. थोरात, शिवनाथ गायकवाड , ब्रम्हगिरी गोस्वामी, प्रकाश शहर वाले, संदीप वाकडे, सुरेश औटे, श्रीराम दापके, लक्ष्मण वाल्डे, भरत सोनवणे, अनिता राठोड, शुभदा देवरे, गितांजली गजबे, रायभान जाधव आदींनी कळविले आहे.

# मौर्य क्रांती महासंघाचे राज्य अधिवेशनासह धनगर जागृती परिषद

आधुनिक केसरी न्यूज



**जेजुरी :** या ऐतिहासिक ठिकाणी 8 नोव्हेंबर 2022 रोजी मौर्य क्रांती महासंघाचे पहिले राज्य अधिवेशन आणि चौथी धनगर जागृती परिषद मोठ्या उत्साहात पार पडली. राज्यभरातून धनगर आणि बहुजन बांधव या परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित होते. जेजुरी गडावर जाऊन राजमाता अहिल्यामाई होळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करीत क्रांतीची मशाल पेटविण्यात आली. यावेळी जेजुरी गडावर परिषदेचे उदघाटक इंजि. शिवाजीराव शेंडगे, संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बलभीम माथेले(परभणी), प्रदेश अध्यक्ष राजीव हाके (धुळे) यांच्या प्रमुख उपस्थितीत जेजुरी गडावरून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. मल्हार सांस्कृतिक भवन येथे मिरवणुकीची सांगता झाली. पारंपरिक गजी धनगरी ढोल वादन, सुंभरांन आणि चांगभलंचा जयघोष करत शाहीर सागर माने आणि पथकाच्या पहाडी आवाजाने परिषदेला उत्साहात सुरुवात झाली.

महासंघाचे जेष्ठ मार्गदर्शक इंजि. शिवाजीराव शेंडगे (सांगली) यांच्या अभ्यासपूर्ण उदघाटनपर भाषणाने परिषदेला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. मरगळ आलेल्या धनगर समाजात एक चैतन्य निर्माण करणारे हे एक वैचारिक केडरबेस संघटन असल्याचे ते म्हणाले.

दोन सत्रात झालेल्या या परिषदेला महासंघाचे राज्य प्रभारी उत्तम भाई कोळेकर,(पालघर) , राज्य आणि विभागीय पदाधिकारी तुकाराम जानकर (सातारा), प्रकाश कुटे (वाशीम), किरण मासुळे, जी. के. सूर्यवंशी (खान्देश), सत्यवान दुधाळ (सोलापूर), गोपीचंद वडितके, सुभाष येळे (कोकण), दत्ता भरणे, डॉ. प्रशांत साळवे, डॉ. दत्ता जगताप, मनोहर कोकरे (प. महाराष्ट्र), विजय वसतकर (बुलढाणा), यांची विशेष उपस्थिती लाभली.

दुसऱ्या सत्रात. सत्यशोधक विचारवंत गोविंदराम शूरनर यांना मारोतीराव पिसाळ मामा यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पहिला सत्यशोधक प्रबोधनकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. खुल्या राज्यस्तरीय काव्य वाचन स्पर्धेचे विजेते कवी बालाजी भागानगरे, रणजित मालगे, गीतांजली पाटील यांना रोख पारितोषिक आणि सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. यावेळी सत्यशोधक पद्धतीने विवाहबद्ध झालेल्या आदर्श जोडप्यांचा सन्मान करण्यात आला. वाघर चित्रपटातील मुख्य अभिनेत्री, इतर कलावंत आणि चित्रपट निर्माते राजेंद्र बरकुडे कुटुंबाला सन्मानित करण्यात आले. यावेळी धनगर टाइम्स या वृतपत्राचे, गोविंद शूरनर लिखित बहुजनांचे प्रबोधन व सत्य शोधक विचारवंत, संचित धनवे लिखित महानायक खंडोबा या ग्रंथाच्या मुखपृष्ठाचे देखील प्रकाशन करण्यात आले.

यावेळी बलुतेदार महासंघाचे कल्याणराव दळे, ओबीसी राज्य संघटक मुबारक नदाफ, तुकाराम माळी मुंबई महापालिका पूर्व आयुक्त लक्ष्मण व्हटकर, धनगर महासंघाचे प्रदेश अध्यक्ष अंकुश निर्मळ, धनगर महासंघाचे प्रवीण काकडे, शेगर महासंघाचे सुनील भगत, पत्रकार रमेश लेंडे, क्रांती संघटनेचे पी. बी. कोकरे, युवा मल्हार सेनेच्या धनश्री आजगे, अडव्होकेट जोतिबा पिसाळ, आनंदा होनमाने (बेळगाव )मल्हार आर्मीचे राहुल मदने यांची अभ्यास पूर्ण भाषणे झाली.

अध्यक्षीय समारोप करताना बलभीम माथेले यांनी संघटन शक्ती आणि समाजाच्या सद्य स्थितीवर भाष्य करत एकट्याने नव्हे तर समाजातील सर्व संघटनांचे नेतृत्व करणाऱ्या बुद्धिजीवी समाज बांधवांनी एकत्र येण्याची गरज व्यक्त केली. यावेळी जेजुरी येथील नगर सेवक संपत कोळेकर, देवस्थानचे विश्वस्थ संदीप जगताप, यशवंत पडळकर,संतोष खोमणे, मोहन खोमणे,अशोक बरकडे,शिवाजी पिसे,, गणेश कोळपे यांची आणि जेजुरी परिसरातील मान्यवर समाज बांधव याचे विशेष सहकार्य लाभले. प्रास्तविकातून राज्य प्रभारी उत्तम कोळेकर यांनी केले. तर महासंघाचे प्रदेश अध्यक्ष राजीव हाके यांनी आपल्या खास बहारदार शैलीतून परिषदेत रंगत आणली.या धनगर जागृती परिषदेच्या निमित्ताने समाजाच्या ज्वलंत प्रश्नांवर फार गंभीर चर्चा झाली. गुरु गोविंद सोन्नर,शैला नवघरे,इंजि. सूर्यकांत पुजारी, शिवाजी वैद्य,सुरेश शिंदे, चंद्रकांत बंडगर, सुभाष शेंगुळे, हनुमंत दवंडे,निलेश बनकर, राम पिसाळ,कालिदास चोरमले, प्रा. रंगराव गढरीं,श्रीकृष्ण डुबे, अनिल हाके, प्रकाश माने,रविंद्र बंडगर, दिवाकर कुकडे, सचिन धायगुडे आणि पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी परिषद यशस्वी केली. महासंघाचे प्रदेशाध्यक्ष राजीव हाके यांनी विशेष मुलाखतीतून उपस्थितांचे प्रबोधन केले.

**सर्व जातींची जातनिहाय जनगणना का ? व कशासाठी ? :** संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व दिल्याने, सर्व जातींची प्रगती होणे शक्य आहे . एकट्याने नव्हे तर एकीने लढावे लागेल, त्या शिवाय पर्याय नाही . आदी विषयांवर या परिषदेत सखोल चिंतन करण्यात आले . बलभीम माथेले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या परिषदेला संबोधित करताना राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व करणारे कमलकांत काळे यांनी पत्रिकेतील विषयांवर मत व्यक्त करतांना, खंडोबा ही समस्त धनगर आणि बहुजन समाजाला जोडणारी विरासत आहे . येथूनच महात्मा फुलेनी प्रेरणा घेतली व सत्यशोधक समाजाची स्थापना केली असल्याचे स्पष्ट करत धनगर बहुजन समाजाच्या वर्तमान स्थितीवर भाष्य केले .

# वारकरी साहित्य परिषदेमधून संत परंपरेचे वास्तविक दर्शन

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, महाराष्ट्राच्या पावन भूमीमध्ये अनेक संत होऊन गेले, त्यांनी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून समाजाची जागृती केली, साधी सोपी सरळ मार्गाने केलेली भक्ती, शुद्ध भाव शुद्ध अंतकरण ठेवून केलेली भक्ती हीच खरी भक्ती आहे ही शिकवण त्यांनी दिली, महाराष्ट्राची परंपरा वारकरी संप्रदायाने जपली आहे, ती पुढे चालू राहावी ह्या हेतूने भोकर येथे दि.11नोव्हेंबर 2022 रोजी वारकरी साहित्य परिषदेच्या 11 व्या वर्धापन दिनानिमित्त नांदेड जिल्हास्तरीय वारकरी साहित्य परिषद घेण्यात आली.

कुठलीही अपेक्षा न करता वारकरी संप्रदायातील मंडळी भजनकरी, वादक, गायक, कीर्तनकार हे सामाजिक प्रबोधनाचा काम करीत असतात अत्यंत मोलाचे काम करणाऱ्या वारकऱ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळावा हेतूने वारकरी साहित्य परिषदेचे महाराष्ट्र अध्यक्ष ह.भ.प. विठ्ठल पाटील काकाजी यांनी शासन स्तरावर वारकऱ्यांच्या विविध प्रश्नांविषयी आवाज उठविला प्रत्येक जिल्ह्यात तालुक्यात वारकरी साहित्य परिषदेच्या शाखा स्थापन करून वारकऱ्यांचे प्रश्न मार्गी लागावेत त्यांच्या समस्या दूर व्हाव्या म्हणून वारकरी साहित्य परिषद काम करते. महिला मंडळाने देखील मोठ्या प्रमाणात दिंडीमध्ये सहभाग घेतला. वा. सा. प. जिल्हाध्यक्ष ह.भ.प. राजेश्वर महाराज बोमनाळीकर यांनी प्रास्ताविकात वारकऱ्यांच्या विविध समस्या निवारण केल्या जातील प्रत्येक तालुक्यात व गावागावापर्यंत शाखा स्थापन करण्यात येतील शाखा स्थापन झाल्या नंतर भजन साहित्य देण्यात येईल, शासनाच्या विविध योजनांचा लाभ कसा मिळेल याबाबत प्रयत्न केले जातील असे ते म्हणाले त्यानंतर विठ्ठल पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता ह्या अध्यक्षस्थानी भोकरचे माजी सभापती गोविंद बाबा गौड पाटील हे होते प्रमुख अतिथी सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष माधवराव अमृतवाड, उद्योजक तथा सरपंच प्रतिनिधी आत्रिक पा. मुंगल, उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते आशिष मोरे, नागनाथराव देशमुख, मनोहरराव पांचाळ यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक कार्याध्यक्ष प्रा. सूर्यकांत पांचाळ यांनी केले. बी. आर. पांचाळ यांनी वारकरी साहित्य परिषदे मार्फत वारकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यात येतील असे सांगितले, अध्यक्षीय समारोपात गोविंद बाबा गौड पाटील यांनी भोकर मध्ये झालेली वारकरी साहित्य परिषद अत्यंत महत्त्वाची बाब असून वारकऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत त्यासाठी आपण प्रयत्नशील राहू पुढील वर्षी चांगल्या प्रकारे मोठी वारकरी साहित्य परिषदेत घेण्यासाठी आपले योगदान निश्चित असेल असे त्यांनी मत व्यक्त केले. सूत्रसंचालन व आभार ह. भ. प. गणपतराव देगावे यांनी केले. यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.




# औराळा येथे कायदेविषयक जनजागृती शिबिर संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील औराळा येथे कन्नडचे उच्च न्यायाधीश यांच्या निर्देशानुसार कन्नड वकील संघ व निधी सेवा समितीने कायदेविषयक जनजागृती शिबिर आज दिनांक 13 11 2022 रोजी ठीक 11 ग्रामपंचायत औराळा येथे मा. सरपंच सोनाली सुरेश बागुल यांचे अध्यक्षतेखाली कन्नड सरन्यायाधीश कोळसे सर व मान्य चंद्रहार ढोकणे साहेब गट विकास अधिकारी वर्ग एक पंचायत समिती कन्नड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. त्यासाठी अँड. चव्हाण सर व अँड नंदू शहा यांनी मृत्यू प्रमाणपत्र कायदे संदर्भात मार्गदर्शन केले . तसेच अँड एन एम शेख सातबारा कुळ कायदा बाबत मार्गदर्शन केले कन्नड कोर्ट सरन्यायाधीश कोळसे सर यांनी जामीन पत्र बाबत मार्गदर्शन केले तसेच मा. गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे साहेब यांनी कायदेविषयक संदर्भात जनजागृती तसेच गावाच्या सर्वांगीण विकासा संदर्भात मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन कक्षाधिकारी अधिकारी पंचायत समिती कन्नड श्री कोलमड सर यांनी केले व आभार प्रदर्शन एस बी गवई ग्रामविकास अधिकारी यांनी केले. याप्रसंगी कन्नड कोर्ट संपूर्ण टीम शे जफर शेख रशिद. जिल्हा परिषद सदस्य गुजराने अण्णा, तंटामुक्ती अध्यक्ष चंद्रकांत देशमुख, सरपंच सोनाली सुरेश बागुल उपसरपंच आकाश पगारे ग्रामपंचायत सदस्य श्रीमती सुरेखा जीवरख, श्रीमती सोनाली निकम, महेंद्र कुमार भारतीय, दिशांत जिवरख, रामदास खवळे सतीश जीवरख, चंद्रकांत बागुल, प्रभाकर बागुल, पवार सर, अंगणवाडी मदतनीस कार्यकर्ते ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामपंचायत प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ उपस्थित होते.

# पोद्दार पँथर संघ विजेता

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शिक्षणासोबत खेळाचे देखील महत्त्व जोपासत पोद्दार स्कूलने पी पी एल चे आयोजन केले होते. पोद्दार स्कूलचे मुख्याध्यापक माननीय श्री अजय घोरपडे सर यांनी पालकांमधील खेळाडू वृत्ती जोपासत प्रथमच शाळेमध्ये पोद्दार प्रीमियर लीगचे आयोजन केले होते. उपांत्य फेरीत पोद्दार किंग इलेव्हन, पोदार पलटण, पोद्दार पँथर व पोद्दार पिकासो हे संघ होते व अंतिम सामना पोदार पँथर व पोदार पलटण यांच्यात झाला व विजेता संघ पोदार पँथर ठरला. मॅन ऑफ द सिरीज नितीन राऊत व मॅन ऑफ द मॅच अजित डेबांनी यांना घोषित करण्यात आले. सर्व संघांचे मनोबल वाढवत जळगाव जिल्ह्याचे विद्यमान खासदार माननीय उन्मेषदादा पाटील व सौ संपदाताई पाटील यांनी शुभेच्छा देऊन विजेत्या संघाचे अभिनंदन केले. पालकांचा सहभाग वाखण्याजोगा होता विद्यार्थी व पालक यांचे अनमोलचे सहकार्य लाभले विद्यार्थी परिषदेने देखील अनमोल सहकार्य केले. या स्पर्धेचे पंच म्हणून धनराज चव्हाण, शुभम गवळी, पंकज देवकर, अरविंद तायडे हे होते. स्कोर बोर्ड लेखन आसिफ खान, ईश्वर वाघ, आकाश कांबळे, आनंद नायर,नंदकिशोर महाले, प्रमोद पाटील यांनी केले. समालोचक म्हणून समाधान खेडकर, कन्हैयालाल बोरसे, धनंजय बोरसे,धनंजय पाटील यांनी काम बघितले. या स्पर्धेच्या आयोजनानिमित्त सर्व पालकांनी पोद्दार स्कूलचे भरभरून कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक श्री अजय घोरपडे सर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी प्रशासनाधिकारी सचिन हळवे, सच्चिदानंद शिंपी यांचे अनमोल सहकार्य लाभले.



# चापानेरमध्ये धन्यवाद मोदीजी अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील चापानेर येथे भारतीय जनता पदाधिकारी यांची धन्यवाद मोदीजी अभियानांतर्गत लाभार्थी यांच्याशी संपर्क करुन धन्यवाद मोदीजी अभियान राबविण्यात आले. याप्रंसगी भाजपा जिल्हाउपाध्यक्ष संजय खंबायते, जिल्हा परिषद सदस्य किशोर आबा पवार भाजपा तालुका सरचिटणीस सुभाष काळे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष प्रदीप बोडखे, ता उपाध्यक्ष संतोष बारगळ शक्तिकेंद्र प्रमुख वाल्मीक पवार, साईकीरण बोर्डे सरपंच संतोष मुठ्ठे, साबळे पाटिल, सागर जाधव, अबाराव पवार, युवराज बोरसे पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते.

# जितेंद्र आव्हाडांच्या पत्नी ऋता आव्हाड यांचा पोलिसांना इशारा

## आरोप सिद्ध झाले नाही तर आम्ही पोलिसांनादेखील कोर्टात खेचणार

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात भारतीय दंड विधानाच्या कलम ३५४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका महिलेच्या विनयभंगाच्या तक्रारीनंतर पोलिसांनी ही कारवाई केली आहे. दरम्यान, पोलिसांच्या या कारवाईनंतर आव्हाड यांनी मी राजीनामा देण्याचा निर्णय घेत आहे, असे विधान केले आहे. आव्हाडांच्या या भूमिकेनंतर राष्ट्रवादी पक्षासह आव्हाड यांच्या पत्नी ऋता आव्हाड यांनी आक्रमक पवित्रा धारण केला आहे. आव्हाड यांच्यावरील आरोप सिद्ध झाले नाही, तर आम्ही पोलिसांनादेखील कोर्टात खेचणार, असे ऋता आव्हाड यांनी सांगितले आहे. त्या आज (१४ नोव्हेंबर) माध्यम प्रतिनिधींशी बोलत होत्या.

जितेंद्र आव्हाड यांनी त्या महिलेला फक्त बाजूला केलेले आहे. या महिलेविरोधात गुन्हा करण्यास प्रवृत्त करणे तसेच बदनामी करण्याचा प्रयत्न करणे या आरोपांखाली आम्ही तक्रार दाखल केली आहे. आपली लोकशाही एवढी खालच्या पातळीवर गेली आहे. आपल्या विरोधकांना हतबल करण्यासाठी कोणताही दुसरा मार्ग नसल्यामुळे महिलेचा उपयोग केला जात आहे, अशी टीका जितेंद्र आव्हाड यांच्या पत्नी ऋता आव्हाड यांनी केली. छट पूजेच्या वेळी आमदार जितेंद्र आव्हाड यांची समाधी बांधायची आहे का? असे वक्तव्य याच महिलेने केले होते. याच कारणामुळे आमच्या कार्यकर्त्या आणि त्यांच्यात बाचाबाची झाली होती. या महिलेसह, महिलेची मुलगी आणि दोन कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत, असेदेखील ऋता गायकवाड यांनी सांगितले.

जितेंद्र आव्हाड यांच्यावर दाखल करण्यात आलेला गुन्हा पोलिसांनी सिद्ध करून दाखवावा. आम्ही आता दोन ते तीन ठिकाणी स्क्रीन लावणार आहोत. आमचा आमदार किती बाईवेडा आहे, हे लोकांना कळू देत. हजार लोकांमध्ये ते एखाद्या महिलेचा विनयभंग करतात हे लोकांना कळू देत. मात्र हे कोर्टात सिद्ध झालं नाही, तर आम्ही पोलिसांविरोधातही कायदेशीर कारवाई करणार आहोत. पोलिसांनी खोटे गुन्हे दाखल केले आहेत. पोलीस विरोधकांना खोटे गुन्हे दाखल करून अडकवत असतील तर त्याची दखल घेतली पाहिजे, असा आक्रमक पवित्रा ऋता आव्हाड यांनी घेतला.



राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांना नुकतीच ‘हर हर महादेव’ या मराठी चित्रपटाचे शो बंद पाडल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. शिवाय त्यानंतर त्यांच्याविरोधात विनयभंगाचाही गुन्हा दाखल करण्यात आला. यामुळे ७२ तासांत दोन खोटे गुन्हे दाखल करण्यात आल्याचे सांगत आता जितेंद्र आव्हाडांनी आमदारकीचा राजीनामा देणार असल्याची घोषणा केली आहे. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शिंदे-फडणवीस सरकारविरोधात आक्रमक झाली आहे. तर आव्हाडांच्या राजीनाम्याच्या निर्णयास गृहमंत्री फडणवीस जबाबदार असल्याचा आरोप राष्ट्रवादीकडून केला जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे विरोधीपक्षनेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पत्रकारपरिषदेत बोलताना अजित पवार म्हणाले, “वास्तविक त्यांनी जाहीर करून टाकले की काही काळात माझ्यावर दोन-दोन गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न केला जातो आणि या सगळ्या दडपशाहीला या सगळ्या हुकूमशाहीला, पोलीस दलाचा ज्या पद्धतीने गैरवापर होतोय त्याला कंटाळून मी राजीनामा देतोय, अशा पद्धतीने त्यांनी ट्वीट केले आहे. माझ्या पहिल्यांदा जितेंद्र आव्हाडांना विनंती आहे की अशाप्रकारे त्यांनी राजीनामा देऊ नये. तसा विचारही त्यांनी मनात आणू नये.”

# जामनेरात अज्ञात व्यक्तींनी मध्यरात्री जाळल्या दुचाकी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जळगाव जिल्ह्यातील जामनेर शहरात दुचाकी जाळण्याचे लोण आता जळगाव शहरानंतर जामनेर शहरातही आले आहे. शनिवारी रात्री एकाच व्यक्तीच्या दोन दुचाकी अज्ञात व्यक्तींनी पेटवल्याची खळबळजनक घटना उघडकिस आली आहे. पोलीस याबाबत सखोल तपास करीत आहेत.जामनेर शहरातील शास्त्रीनगर भागात संतोष दिनकर थटार हे राहतात. शनिवारी दि. १२ नोव्हेंबर शनिवारी रात्री २ किंवा ३ वाजेच्या सुमारास संतोष दिनकर थटार यांच्या मालकीच्या दोन मोटरसायकल अज्ञात समाजकंटकाने डिझेल व कपडे टाकुन पेटवून दिल्याची घटना घडली आहे. सदरील घटना ही रात्री दोन ते तीन वाजेच्या दरम्यान घडली.यात एमएच१९ बीई ४२८७ या नंबर ची होन्डा शाईन गाडी पूर्णपणे खाक झाली तर दुसरे वाहनही पेटणार तोच शेजारी असलेल्या रत्नाबाई जैन यांना जाग



आली असता त्या समाजकंटकाने पळ काढला. एम एच १४ एचआर १८४४नंबरची फॅशन प्रो वाहनाचे आगीची आस लागून नुकसान झाले आहे. तरी संतोष थटार यांच्या फिर्यादीवरुन जामनेर पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे पुढील तपास जामनेर पोलीस स्टेशन करीत आहे.

# काम करायचे नसेल तर राजीनामा द्या; राज ठाकरेंकडून पदाधिकाऱ्यांची कानउघडणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसेकडून पक्षबांधणीसाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. अनेक ठिकाणी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचे मेळावे घेण्यात येत आहेत. आज वांद्रे येथे पदाधिकाऱ्यांची एक बैठक आयोजित करण्यात आली होता. या बैठकीला स्वतः राज ठाकरे उपस्थित होते. यावेळी राज ठाकरेंकडून काम न करणाऱ्या पदाधिकाऱ्यांची कान उघडणी करण्यात आली असल्याची माहिती आहे. दरम्यान, या बैठकीनंतर मनसे नेते बाळा नांदगावर यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. “प्रत्येक मतदार संघाची परिस्थिती नेमकी काय आहे? याचे अवलोकन करण्यासाठी आजची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी राज ठाकरे स्वतः उपस्थित होते. यावेळी त्यांनी सर्व विभागप्रमुखांना काही सुचनाही केल्या. तसेच काही ठिकाणी विभाग प्रमुख बदलण्याची मागणी करण्यात येत होती. त्यानुसार त्यांनी संबंधित ठिकाणी बदल करण्याचे आदेश दिले राज ठाकरेंकडून देण्यात आले असल्याची माहिती”, मनसे नेते बाळानांदगावकर यांनी दिली. दरम्यान, ज्यांना पदाधिकाऱ्यांना काम करायचं नाही त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन पद खाली करावे आणि इतरांना



काम करण्याची संधी द्यावी, असे राज ठाकरेंकडून सांगण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांना राज ठाकरेंच्या कोकण दौऱ्याबाबत विचारले असता, अद्यापही तारीख निश्चित झाली नसून ती निश्चित होताच माहिती देण्यात येईल, असे ते म्हणाले.

# ॲड. गुणरत्न सदावर्तेंना नक्षलवाद्यांचे धमकीचे पत्र; पोलिसात तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एसटी कर्मचारी आंदोलनामुळे वकील गुणरत्न सदावर्ते प्रकाश झोतात आले होते. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या ‘सिल्वर ओक’ निवास्थानावरील हल्ल्याप्रकरणी सुद्धा सदावर्तेंना अटक करण्यात आली होती. त्यातच आता नक्षलवाद्यांकडून गुणरत्न सदावर्तेंना धमकीचे पत्र मिळाले आहे. त्यात मराठा आरक्षण, ईडब्ल्यूएस आरक्षणाचा उल्लेख पत्रात असल्याचे सदावर्तेंनी सांगितले आहे. गुणरत्न सदावर्ते टीव्ही ९ या मराठी वृत्तवाहिनीशी बोलत होते. सदावर्ते म्हणाले, “कम्युनिस्ट पक्ष भारत मुंबई विभाग यांच्याकडून नक्षली संघटनेचा संदर्भ असलेले पत्र कार्यालयात प्राप्त झाले आहे. ‘लाल सलाम’ असे लिहलेल्या पत्रात मराठा आरक्षण, ईडब्ल्यूएस आरक्षण आणि महाविकास आघाडी सरकारच्या काळात झालेल्या आंदोलनाचा उल्लेख आहे. आरएसएसबरोबर माझा संबंध असल्याचेही पत्रात म्हटले आहे. नक्षली संघटनेच्या जनता अदालतमध्ये २२ फेब्रुवारी २०२२ झालेल्या बैठकीत माझी हत्या करण्याचा निर्णय झाला होता,” असे खळबळजनक दावा करत सदावर्तेंनी सांगितले, “पत्राच्या आधारे पोलीस तक्रार दिली आहे. हा विषय एटीएस आणि नक्षल सेल आणि गृहमंत्रालयाच्या संबंधित आहे.



# जय लहुजींच्या जयघोषाने दुमदुमला परिसर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जगेन तर देशासाठी आणि मरेल तर देशासाठी अशी भीष्मप्रतिज्ञा करुन देशात क्रांतीची मशाल पेटविणारे क्रांतिकारकांचे आद्यक्रांतीगुरु वस्ताद लहुजी साळवे यांच्या 228 व्या जयंतीनिमीत्त आज 14 नोव्हेंबर रोजी सिडको एन 8 मधील त्यांच्या पुतळ्याजवळ "मातंग एकता आंदोलन" या राज्यव्यापी सामाजिक संघटनेच्या वतीने अभिवादन सभा घेण्यात आली व त्यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले यांवेळी जय लहुजी व महापुरुषांच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. देवगिरी नागरी सहकारी बँकेचे उपाध्यक्ष प्रा. संजय गायकवाड व संघटनेचे राज्य सल्लागार तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राजु भाऊ आहिरे यांनी लहुजींच्या जीवनकार्यावर व इतिहासांवर प्रकाश टाकला. याप्रसंगी राजु भाऊ आहिरे, प्रा.संजय गायकवाड, जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार संदीप मानकर, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष नरेंद्र भालेराव, कार्याध्यक्ष विक्की लोखंडे, बळीराम पाटील संस्थेचे सचिव प्रा. नितीन राठोड, पं.स.सदस्य सुभाष भालेराव, शहराध्यक्ष किशोर तुपे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा राजश्री साठे, राजु खाजेकर, विजय आहिरे, अंबादास पवार, श्रीकांत घुले, मनेश ससाणे, गजानन मानकर, ज्ञानेश्वर निकाळजे, सुरेश वाघमारे, राजु खरात, भरत मानकर, राहुल अंभोरे, कैलास भालेराव, संजय कसारे, योगेश दणके, विलास भालेराव, गणेश दांडगे, मनिष भालेराव, अजय गाढे, मुकेश वाघुले, बबन गायकवाड, पत्रकार समाधान वाणी, उमेश नेमाडे, रामदास गायकवाड, आसाराम कसारे, बाबासाहेब नवगिरे, राजेश त्रिभुवन, सुवर्णा साबळे, छायाताई खाजेकर, कल्पना त्रिभुवन, ज्योतीताई जाधव, पुष्पाताई गायकवाड, संजय तुपे, आदींसहित मातंग एकता आंदोलनाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव आणि माता-भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हाध्यक्ष संदीप मानकर यांनी केले तर आभार शहराध्यक्ष किशोर तुपे यांनी मानले.

# राजपूत-परदेशी समाजाला आजच जागृतीची गरज का : राजपूत

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** राजपूत-परदेशी समाज हा विखुरलेला भटका समाज आहे, त्यांच्या या विखुरलेल्या वृत्तीचा फायदा इतिहासात अनेकांनी घेतला, आजही अनेक जन घेत आहे. मात्र हा समाज काल जेथे होता तो आजही तेथेच आहे. काल दुसऱ्याची चाकरी करीत होता आजही तीच चाकरी करीत आहे. काल बड्यांची हांजी, हांजी आजही होत आहे, मात्र या समाजाच्या अडचणी, समस्या,प्रश्न सोडवण्यासाठी कोणीही ठोस प्रयत्न काल केले नाही व आजही कोणी करीत नाही त्यामुळे उद्या येणारी नवी पिढी या समाजाला माफ करणार नाही, यासाठी स्वतः चे अस्तित्व निर्माण करण्यासाठी या समाजाने आज जागृक होऊन भविष्यातील मुलां-बाळांच्या उन्नती, शैक्षणिक विकास, सामाजिक विकासासाठी आज जागरूक होण्याची नितांत गरज आहे,असे प्रतिपादन वैजापूर येथे राजपूत/परदेशी समाजाच्या बैठकीत जेष्ठ समाजसेवक धोंडीरामसिंह राजपूत यानी केले. पुढील महिन्यात औरंगाबाद येथे राजपूत-परदेशी समाजाचा मेळावा आहे त्या अनुषंगाने आयोजित बैठकीत ते बोलत होते, ते पुढे म्हणाले की,देशाच्या मातीशी एकनिष्ठ राखणाऱ्या या समाजाने अनेक अन्याय, अत्याचार सहन केलेले आहेत, व आजही काही समाजकंटक या समाजाच्या शासकीय सोयी, सवलती मध्ये आडकाठी बनत आहे,अशा समाज विघातक वृत्तीना आला घालण्यासाठी ही समाज संघटित होणे ही काळाची गरज आहे, या दोन्ही समाजाने रोटी व्यवहार सोबत बेटी व्यवहार आरंभ करून समाजातील अंतर ही दूर करावे, समाजाच्या संघटित होण्यामुळे आजची तरूण पिढी ही चुकीच्या पाऊल उचलण्यापासून परावृत्त होऊन, समाजात कौटुंबिक, सामाजिक स्थिरता लाभेल व कुरापती करणाऱ्यांना मोठी चपराक बसेल, गत काळातील हेवे-दावे विसरून समाज संघटित व ऐक व्हावा असेही ते म्हणाले. या बैठकीत नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, माजी नगराध्यक्ष राजुसिंग, बैठकीत नगर अध्यक्ष शिल्पाताई परदेशी, माजी नगरध्यक्ष राजुसिंह राजपूत, माजी शिवसेना प्रमुख सुशालसिंह राजपूत, राजपूत समाज अध्यक्ष जीवन राजपूत, विठ्ठलसिंह राजपूत, गोकुलसिंग राजपूत, दिनेश राजपूत, यांच्या सह वैजापूर शहर व तालुक्यातील मान्यवर,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. परदेशी समाज बैठकीत धोंडीराम राजपूत यांनी संबोधित केले.



# भगवान राईतकर यांना पत्रकाररत्न गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**मेहकर :** मागील वीस वर्षापासून विविध वर्तमानपत्राच्या माध्यमातून बातमी लेखन आणि विविध विषयावर लेखन करणारे जेष्ठ पत्रकार भगवान राईतकर (गोभणीकर) यांना दोस्ती फाऊंडेशन अहमदनगर च्या वतीने लोककलावंत पै. मजनूभाई शेख पत्रकाररत्न गौरव पुरस्कार - २०२२ जाहीर झाला आहे. २००१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथून भगवान राईतकर यांनी डॉ. प्रा. सुधीर गव्हाणे, डॉ.प्रा. वि. ल. धारूरकर, डॉ. प्रा. सुरेश पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकारितेमधील बी.जे. (वृत्तपत्रशास्त्र) डिग्री पूर्ण केली. त्यानंतर लोकमत, लोकसत्ता , तरुण भारत या वृत्तपत्रामध्ये पत्रकार म्हणून काम केले. दै. देशोन्नती, दै. पुण्यनगरी, दै,मातृभूमी, दै. लोकमत आणि दै. अजिंक्य भारत इत्यादी वृत्तपत्रामध्ये मागील दहा वर्षापासून आध्यात्मिक आणि प्रासंगिक लेखन भगवान राईतकर करीत असतात. भगवान राईतकर हे सध्या दै. विश्वजगत मध्ये अतिथी साहित्य संपादक म्हणून संपादन आणि लेखन करतात. सोबतच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, इंग्रजी विषयाचे मार्गदर्शन, संगीत विषयाचे मार्गदर्शन, व्याख्याने व प्रवचने यासाठी भगवान राईतकर हे तालुक्यामध्ये सुप्रसिद्ध आहेत. लोककलावंत पै. मजनूभाई शेख पत्रकाररत्न गौरव पुरस्कारासाठी निवड झाल्याचे पत्र दोस्ती फाऊंडेशन, अहमदनगरचे अध्यक्ष रज्जाकभाई शेख यांनी निवड पत्राद्वारे कळविले आहे. पत्रकारिता, शैक्षणिक, सामाजिक, संगीत आणि स्पर्धा परीक्षेमध्ये कार्य करणाऱ्या भगवान राईतकर यांना पत्रकाररत्न गौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांमध्ये अभिनंदन होत आहे.

# संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळ्यास आपेगावात आजपासून प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** तालुक्यातील श्री शेत्र आपेगाव येथे वारकरी साम्प्रदायाचे अराध्य दैवत आसलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्याला १५ नोव्हेबर मंगळवार रोजी सुरवात होत आहे त्यानिमीत्त माऊलीच्या मंदीरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या सप्ताह काळात ब्रह्मलीन कैवल्यमूर्ती विष्णू महाराज कोल्हापूरकर(गुरुजी) यांच्या आशीर्वादाने अध्यात्म विवेकी ज्ञानेश्वर विष्णू महाराज कोल्हापूरकर (दादा) (अध्यक्ष ज्ञानेश्वर मंदिर श्रीक्षेत्रआपेगाव) यांच्या डोळस नेतृत्वाने उत्साहात प्रारंभ होत आहे. या सप्ताहात दैनिक कार्यक्रम पहाटे ४ ते ५ काकडा भजन, ५ ते ६ माऊलींचा महाभिषेक ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम, ७ ते 10 ज्ञानेश्वरी पारायण, अमृतानुभव चांगदेव पासष्टी, १० ते १२ बाळ क्रीडा गाथा भजन, ४ ते ५ ज्ञानेश्वरी प्रवचन, ६ ते ७ हरिपाठ, ८ ते १० हरि कीर्तन, १२ ते 3 हरीजागर असणार आहे या महोत्सवात ज्ञानेश्वरी व्यासपीठ चालक ह.भ.प. राम महाराज तांबे तसेच बाळक्रीडा गाथा भजन ह.भ.प. योगेश महाराज सोन्नेसह या सोहळ्यास महान कीर्तनकार याचे कीर्तन होणार आहे. ह.भ.प. दादा महाराज पाटील (वारकरी शिक्षण संस्था लाडगाव) ह.भ.प. नाना महाराज काकडे (वारकरी शिक्षण संस्था पैठण) ह.भ.प. चांगदेव महाराज काकडे (कंडारी) ह.भ.प. महंत महादेव महाराज गिरी( अंतरवाली) रामायणाचार्य राजेंद्र महाराज वाघमारे (गोंदी) भागवताचार्य प्रशांत महाराज खानापूरकर, भागवताचार्य शिवाजी महाराज खवणे (सेलू) यांचे किर्तन होतील तसेच दिनांक २२/११/ सकाळी ९ ते १२ अध्यात्म विवेकी ज्ञानेश्वर विष्णु महाराज कोल्हापूरकर (दादा) यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल. या सोहळ्यामध्ये काकडा भजन ह.भ.प. राजेंद्र महाराज चोरडिया (संभाजीनगर) ह.भ.प. कल्याण महाराज तांबे, ह.भ.प. बाबासाहेब महाराज भुतेकर, रघुनाथ महाराज कदम, मृदंगाचार्य ऋषिकेश गणेश महाराज तराशे, अर्जुन महाराज काळे, गायनाचार्य माऊली महाराज खवणे, संजय महाराज शिंदे, शंकर महाराज गिरगे, दिगंबर महाराज गिरगे,बद्रीनाथ महाराज गिरगे, कु. किशोरी महाराज खवणे, गोविंद महाराज कुबेर, योगेश महाराज गलधर, रामदास महाराज फलके आदी ज्ञानेश अध्यात्म विद्या संस्थेतील आजी- माजी विद्यार्थी यांचे संगीत भारुडाचा कार्यक्रम होईल. आरएमडी फाउंडेशन पुणे यांच्या साह्याने माऊलींच्या ज्ञानपीठ सभागृहाचे माऊली चरणी अर्पण व लोकर्पण सकाळी ११:०० वाजता विशेषउपस्थिती आर.एम.डी. फाउंडेशनच्या उपाध्यक्ष शोभाताई रशिकलाल धारिवाल ज्ञानपीठ संत पूजन पुनीतजी बालन (अध्यक्ष पुणे बालन ग्रुप तथा अध्यक्ष इंद्राणी बालन फाउंडेशन पुणे) व त्यांच्या पत्नी जान्हवीताई बालन (अध्यक्षा : आर.एम. डी. फाउंडेशन पुणे) यांच्या शुभहस्ते ज्ञानपीठ सभागृह लोकार्पण सोहळा या सोहळ्यासाठी प्रमुखपाहुणे : महेश साळुंके (आर्किटेक छत्रपती संभाजीनगर) तसेच समस्त ग्रामस्थ भाविक भक्त वारकऱ्यांचे उपस्थितीत हा लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे. संगीतरत्न रामेश्वर महाराज देशमुख, संगीत अलंकार प्राध्यापक गणेश महाराज आव्हाड यांचे दुपारी १२:३० ते २:३० वाजता संगीत जुगलबंदीचा कार्यक्रम असणार आहे. तदनंतर सायंकाळी ४:३० वाजता अध्यात्मविवेकी गुरुवर्य ज्ञानेश्वर विष्णू महाराज कोल्हापूरकर (दादा) यांच्या शुभहस्ते दहीहंडी चा कार्यक्रम संपन्न होईल. सायंकाळी ७ वाजता संत ज्ञानराज माऊली माता रुक्मिणी आई-पिता विठ्ठलपंत यांची पालखी नगर प्रदक्षिणा होऊन कार्यक्रमाची सांगता होईल. या कार्यक्रमाचा सर्व भाविक भक्त वारकरी यांनी लाभ घ्यावा असे आवाहन ह.भ.प.अध्यात्म विवेकी ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर दादा माऊली जन्मसंस्थान आपेगाव यांनी केले आहे. वारकऱ्यांना पैठण ते आपेगाव जाणे येण्यासाठी दि. 22/11/2022 रोजी दिवसभर अप्पासाहेब श्रीमंतराव मिसाळ, अनिल श्रीमंतराव मिसाळ रा.आपेगाव व गोविंद देविदास औटे, रा.नायगाव या परिवाराच्या वतीने मोफत तीन क्रुझर जीपची व्यवस्था गतवर्षीप्रमाणेच करण्यात आलेली आहे.



या सोहळ्यात संजीवन सोहळ्याचे विशेष म्हणजे श्री संत ज्ञानराज माऊलींच्या मूर्तीवर किरणोत्सव दिनांक २०,२१, २२,नोव्हेंबर रोजी दुपारी १२ :४१ ते १२ :५२ वाजेपर्यंत माऊलींच्या मुखार्विंदावर सूर्यकिरण( विराजमान )दर्शन होणार आहे . हा किरणोत्सवाचा अनुभव गत वर्षीच्या संजीवन समाधी सोहळ्यामध्ये सर्व भाविकांनी याचि देही याचि डोळा घेतला .सन २०२१ च्या सोहळा दिवशी सकाळपासून सुर्य ढगाआड होते सुर्यदर्शन होत नव्हते पण दुपारी ठीक १२ ;५० वा सुर्यदेव काळोख,ढगातुन आगमन झाले ते माऊलींच्या मुखार्विंदावर किरणोत्सव केला आणि पुन्हा दिवसभर सुर्यदेव ढगाआड गेले .तसाच अनुभव यावर्षी सुद्धा घ्या .ही अध्यात्म आणि विज्ञान यांचा अलौकिक साक्षात्कार याचि देही याचि डोळा बघा .

**भजन सम्राट सदानंद महाराज मगर (पैठण)**



# सावळदबारा येथे जि.प. शाळेत माजी पंतप्रधान नेहरूंना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जिल्हा परिषद शाळेत माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू जयंती व बाल दिनानिमित्त सोमवार दि.१४/११/२२ सोमवार रोजी जि.प. शालेय विद्यार्थ्यांनी गाणी गाऊन,भाषणे करून व विविध कला सादर करून नेहरूंना अभिवादन केले. केंद्र प्रमुख एम.डी. सोनवणे यांनी नेहरू जीवनावर व शिक्षणावर कविता सादर करून मुलांना माजी पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या जीवनातिल गोष्टी सांगितल्या. या प्रसंगी मुख्याध्यापक तथा केंद्र प्रमुख एम.डी. सोनेनो व भागवत गायकवाड यांनी नेहरूंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी शाळेय व्यास्थापन समितीचे अध्यक्ष, शिक्षक वृंद, केंद्र प्रमुख एम.डी.सोनवणे, भागवत गायकवाड, सतीश ढोणे, सरकटे मँडम,गवळी सर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा पैठण तालुक्यातील पहिला विजय

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील टाकळी येथील शेतकरी सहकारी सोसायटीच्या सर्वच उमेदवार भरघोस मतानी निवडून आल्याने पैठण तालुक्यातील हा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा पहिला विजय मिळवल्याने टाकळी येथील नवनिर्वाचित सदस्यांचा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष माऊली मुळे व पदाधिकाऱ्यांनी सर्वांचे अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.
गेल्या कित्येक वर्षांपासून प्रस्तापित गावपुढार्यांचे या शेतकरी सोसायटीवर वर्चस्व होते,परंतु गावातील सर्वसामान्य नागरिक शेतकर्यांनी गेल्या कित्येक वर्षाची सोसायटीवरील सत्ता आता नवतरुणाच्या हाती दिल्याने प्रस्थापितांना आता चिंतन करण्याची गरज आहे.



# अथर्व फाउंडेशनतर्फे 'ऑल प्ले अ कार्निव्हल ऑफ जॉय'ची रंगतदार प्रस्तुती

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृह, बोरिवली येथे अथर्व फाऊंडेशन आणि ऑल प्ले प्रॉडक्शनतर्फे "ऑल प्ले अ कार्निव्हल ऑफ जॉय" आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोरिवलीतील शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना नाटक, कविता आणि स्किट्स मंत्रमुग्ध केले. यावेळी प्रमुख पाहुणे गोपाळ शेट्टी, खासदार उत्तर मुंबई, सतींदर एस. आहुजा, माननीय काउंसिल, जॉर्जियाचे काउंसिल, अरुण नलावडे, प्रसिद्ध चित्रपट आणि थ्रेटर व्यक्तिमत्व, वर्षा राणे, ट्रस्टी अथर्व फाउंडेशन आणि सुनील राणे, आमदार बोरिवली उपस्थित होते. ऑल प्ले कार्निव्हलमध्ये उपस्थित प्रेक्षकांनी बोरिवलीतील विविध शाळांमधील मुलांनी केलेली विविध स्किट्स, बॉलीवूड गाणी आणि कविता सादरीकरणाला दाद दिली. शिवाजी महाराजांच्या जीवनकथेवर आधारित नाट्यमय सादरीकरण आणि श्रीमती वर्षा राणे दिग्दर्शित द्वारका प्रसाद माहेश्वरी लिखित वीर तुम बढ़े चलो या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण होते.
यावेळी बोलताना सुनील राणे म्हणाले की, अथर्व फाऊंडेशनने आयोजित केलेला ऑल प्ले कार्निव्हल हा बोरिवलीतील स्थानिक लोकांसाठी आजूबाजूच्या मुलांसमोर त्यांचे कलागुण दाखविण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ बनले आहे. मुलांनी सादर केलेल्या विविध सादरीकरणाने पाहुणे आणि उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.



# माळेगाव येथे माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी उपक्रमांतर्गत चर्चासत्र


आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील माळेगाव येथे दि 12-11-2022 रोजी माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी उपक्रमांतर्गत चर्चासत्र कृषि विभागामार्फत "माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी" कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांसाठी रब्बी हंगाम उत्पादकता वाढ व बिज प्रक्रिया प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. यावेळी मंडळ कृषि अधिकारी जे के जाधव यांनी पिक विमा योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग याविषयी मार्गदर्शन केले व शेतकऱ्यांच्या कृषी विषयक समस्या जाणून घेतल्या. तसेच कृषि सहाय्यक परीक्षित पाटील यांनी कृषि यांत्रिकीकरण, महाडिबीटी,फळबाग योजना, मागेल त्याला शेततळे योजना, लोकसहभागातुन वनराई बंधारे याविषयी माहिती दिली व रब्बी ज्वारी व हरभरा बिज प्रक्रिया प्रात्यक्षिक करून दाखविले. यावेळी कार्यक्रमास गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी यांची उपस्थिती होती.

# अभिनेते सुनील शेंडे यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** हिंदी चित्रपट,मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज हुरहुन्नरी अभिनेते सुनील शेंडे यांचे निधन मनाला चटका लावून गेले. रसिक चाहत्यांना हा एक धक्काच आहे.१९८० ते ९० घ्या दशकात त्यांनी अभिनय क्षेत्रात ठसा उमटवला.



१९८२ साली त्यांनी गांधी चित्रपटातुन कारकिर्दीस सुरुवात केली.अभिनेते शाहरुख खान यांच्या सर्कस टिव्ही मालिकेत ते वडीलांच्या भुमिकेत दिसले. अतिशय भारदस्त आवाज,व रूबाबदार व्यक्तिमत्व असलेले सुनील शेंडे यांनी पोलिस आणि राजकारणी या भुमिकेत ते आपल्याला दिसून आले. अभिनेते संजय दत्त, अमिर खान सारख्या दिग्गज कलाकारांसमवेत त्यांनी चित्रपटात काम केले. जमीन, यशवंत, आई, कृष्ण अवतार, वास्तव, सरफरोश, बॉम्बे बॉईज, जिद्दी, गुनाह, निदान असे चित्रपट संस्मरणीय ठरले. काथुंग, मधुचंद्राची रात,जसा बाप तशी पोरं, ईश्वर, नरसिम्हा, निवडुंग अशा दर्जेदार मराठी चित्रपटात अभिनय करून प्रेक्षकांवर छाप पाडली. त्यांनी सहायक अभिनेत्याच्या भूमिकांना न्याय दिला. ९०च्या दशकातील त्यांचे चित्रपट खुप गाजले.
गेली पाच वर्ष ते अभिनयापासून दुर होते.आपल्या राहत्या घरी ते चक्कर येऊन पडल्याने त्यांच्या शरीरातील रक्तस्राव झाल्याने त्यांचे वयाच्या ७५व्या वर्षी प्राणज्योत मालवली.व एक हुरहुन्नरी कलाकार काळाच्या पडद्याआड गेला.हा रसिक प्रेक्षकांना हा एक धक्काच आहे. आपण ऐका जेष्ठ अभिनेत्याला मुकलो आहोत. त्यांच्या भुमिका कायम प्रेक्षकांच्या कायम स्मरणात राहतील.

# महाराष्ट्राच्या विकासासाठी वाटेतील काट्यांशी लढत पुढे जाऊ : जयंत पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबई : मुद्दे नसले की गुद्द्यांवर येऊन प्रत्येकवेळी नवा विषय उकरून काढत विरोधात बोलणाऱ्याला अटक कशी होईल हाच मनसुबा सत्ताधाऱ्यांचा आहे. मात्र सर्वांगीण महाराष्ट्राच्या विकासासाठी वाटेतील काट्यांशी लढत आम्ही पुढे जाऊ कारण महाराष्ट्रातील जनतेचा आशीर्वाद आणि विश्वास आमच्या पाठीशी आहे असा आत्मविश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी ट्विटमध्ये व्यक्त केला आहे.सत्तेचा सदुपयोग करून सर्वसामान्य जनतेचे हित साधण्याऐवजी सत्तेला हुकूमशाहीचे अस्त्र मानून त्याचा दुरुपयोग विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी, त्यांची सर्व बाजूने कोंडी करण्यासाठी केला जातोय असा थेट आरोप जयंत पाटील यांनी केला आहे.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# मल्लखांब स्पर्धेमध्ये वेदांत, अदिती, राधिका, सिद्धांत विजयी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जिल्हास्तरीय मल्लखांब स्पर्धेमध्ये वेदांत रणदिवे, आदिती पठाडे, राधिका सोनवणे, सिद्धांत रणदिवे यांनी आपल्या गटामध्ये सुवर्णपदक पटकावत विजयी मिळविला. धर्मवीर संभाजी विद्यालयात या स्पर्धा क्रीडा भारती आणि लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने आयोजित करण्यात आल्या होत्या. सकाळच्या सत्रात मल्लखांब स्पर्धेचे उद्घाटन ॲड. नितीन राठोड यांच्या हस्ते करण्यात आले तर अध्यक्षस्थानी लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघाचे अध्यक्ष प्रा.संजय गायकवाड होते. तर दुपारच्या सत्रात स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण प्रा.बाळासाहेब वाल्हेकर यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य नारायण बाभूळगावकर, डॉ.संदीप डफळे, छायाताई खाजेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. 14 व 17 वर्षाखाली मुला व मुली साठी आयोजित या स्पर्धेमध्ये १२२ खेळाडूंनी सहभाग नोंदविला तर सर्व गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पाठवणाऱ्या स्पर्धकांना रोख पारितोषिके, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

**स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे आहे : 14 वर्षाखालील मुले** प्रथमः वेदांत अनिल रणदिवे द्वितीयः ऋषी सतीश पाठारे तृतीयः सार्थक वाघ. **17 वर्षाखालील मुले** प्रथमः सिद्धांत अनिल रणदिवे द्वितीयः आदित्य बबन शिरोळे तृतीयः विशाल रंगनाथ मनगटे. **14 वर्षाखालील मुली** प्रथमः अदिती पठाडे, द्वितीयःमेघा शिंदे तृतीयःअंजली जाधव, **17 वर्षाखालील मुली,** प्रथमःराधिका सोनवणे द्वितीय : योगिता डुरे, तृतीय : श्रुती गायकवाड. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी क्रांतिवीर लहुजी साळवे कर्मचारी महासंघाचे भाऊसाहेब काळुंखे, सूर्यकांत सांभाळकर, किशोर धनके, संजय रणदिवे, श्रीकांत घुले, रवी घोडे, लोकेश संतवाडकर, गणेश ठोंबरे, क्रीडा भारतीचे विनायक राऊत, प्रशांत जमदाडे यांनी परिश्रम घेतले.






# आ. राजेश पवार यांच्या पुढाकारातून उमरी येथे नेत्रतपासणी व मोफत चष्मे वाटप शिबिराचा प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**उमरी :** आमदार राजेश पवार, पूनमताई पवार यांच्या पुढाकारातून नेत्रतपासणी व मोफत चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिराचा आज शुभारंभ झाला. सदर शिबिरात 21 नोव्हेंबर दरम्यान तपासणी होणार आहे. या शिबिराचा उमरी तालुक्यातील सर्व नागरीकांनी लाभ घ्यावा अशी, विनंती आयोजक सोमनाथ हेमके यांनी केली आहे. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष नगरपालिकाचे नगर अभियंता गणेश ताटे, पोलीस निरीक्षक कितेसर, संतोष मुंडे नगरपालिका अभियंता, गणेश मदने वरिष्ठ लिपिक, चंद्रकांत कांबळे मुकदम, एस.डी. करपे, प्रकश चौकडे, नेत्र चिकित्सालय अधीकारी उमरी, किशोर ठोकरे, संतोष शिंदे तुकाराम कंधारे, दताजी वारेव्वार पो. पा. उमरी, नगरसेवक रामराव मुधीराज, सोमनाथ पडोळे लक्षीमन डोपलवर, माधव वडजे, शंकर वाटमवर, संदीप उमरे, मॅचेवाड साहेब आदींची उपस्थिती होती.

# राष्ट्रवादीकडे नैतिकता असेल तर आव्हाडांना पक्षातून निलंबित करा

## भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस महिला सक्षमीकरणाची चर्चा करते पण त्या पक्षाकडे नैतिकता असेल तर त्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार आणि विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी आ. जितेंद्र आव्हाड यांना पक्षातून निलंबित केले पाहिजे, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी पुणे येथे केली. जितेंद्र आव्हाड यांच्या गुन्ह्याचे समर्थन करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कारवाई केली पाहिजे, असेही ते म्हणाले. चंद्रशेखर बावनकुळे पुणे जिल्ह्याच्या संघटनात्मक प्रवासात होते. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, भाजपा पुणे शहराध्यक्ष जगदीश मुळीक, आ. माधुरी मिसाळ, आ. सिद्धार्थ शिरोळे, माजी सभागृहनेते गणेश बीडकर आणि शहर संघटन सरचिटणीस राजेश पांडे उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात दाखल झालेला विनयभंगाचा गुन्हा आणि त्यांनी विधानसभा सदस्यत्वाच्या राजीनाम्याचा दिलेला इशारा याविषयी प्रतिक्रिया विचारली असता चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, जितेंद्र आव्हाड यांचे कृत्य व्हिडिओमध्ये दिसत आहे. त्यांनी हाताने धरून एका महिलेला बाजूला केल्याचे स्पष्ट दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस महिला सक्षमीकरणाची चर्चा करते पण त्या पक्षाकडे नैतिकता उरली असेल तर त्यांनी आजच आव्हाड यांना पक्षातून निलंबित केले पाहिजे. ते म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याविषयी नुकताच एका नेत्याने अपशब्द उच्चारला. भारतीय जनता पार्टी त्याचे कधीही समर्थन करणार नाही. पण त्यावेळी आंदोलन करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आता जितेंद्र आव्हाड यांचे कृत्य व्हिडिओत दिसत असूनही समर्थन करतात. हा त्या पक्षाचा दुटप्पीपणा आहे. त्यांनी सांगितले की, जितेंद्र आव्हाड यांनी केलेले कृत्य जितके चूक आहे तितकेच त्याचे समर्थन राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांकडून करणेही चूक आहे. शहरात असे होत राहते, असे ज्यांनी म्हटले त्यांच्यावरही कारवाई झाली पाहिजे. याबाबत आपण उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलणार आहोत. देवेंद्र फडणवीस अत्यंत संवेदनशील आहेत. ते गृहमंत्री असताना राज्यात दादागिरी चालू देणार नाही. भाजपा हे सहन करणार नाही.


# आव्हाडांच्या कृत्याबद्दल सुप्रियाताई, रूपाली चाकणकर गप्प का ?

## भाजपा महिला मोर्चा प्रदेश महामंत्री रिदा रशीद

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राष्ट्रवादीचे आ.जितेंद्र आव्हाड यांनी रविवारी ठाण्यातील एका फ्लायओव्हरच्या उद्घाटनावेळी आपल्याशी केलेल्या गैरवर्तनाबाबत महिलांच्या सन्मानाची भाषा करणाऱ्या खा.सुप्रियाताई सुळे, महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपलीताई चाकणकर या गप्प का, त्यांचा महिलांच्या सन्मानाविषयीचा कळवळा आता गेला कुठे असा सवाल भाजपा महिला मोर्चा प्रदेश महामंत्री रिदा रशीद यांनी सोमवारी केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यावेळी उपस्थित होते. श्रीमती रशीद म्हणाल्या की, ठाण्यात रविवारी झालेल्या फ्लायओव्हरच्या उद्घाटन कार्यक्रमाला आमंत्रण असल्यामुळे मी तेथे गेले होते. या कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटण्यासाठी मी बाजूला थांबले होते. मुख्यमंत्री वाहनातून निघाले असताना मी त्यांना भेटण्यासाठी जात असताना समोरून येणाऱ्या राष्ट्रवादीचे आ.जितेंद्र





आव्हाड यांनी मला सरळ-सरळ बाजूच्या पुरुषांच्या गर्दीत ढकलून दिले. ढकलून देत असताना, 'तू इथे काय करते आहेस,' असे ते म्हणाले. या घटनेबाबत आपण पोलिसांकडे तक्रार केली असून त्यानुसार प्राथमिक माहिती अहवाल दाखल झाला आहे. या घटनेची ध्वनिचित्रफित सर्वत्र प्रसारित झाली असून त्यात आव्हाड यांनी मला कोणत्या पद्धतीने ढकलले हे स्पष्टपणे दिसते आहे.

राष्ट्रवादीच्या खा.सुप्रियाताई सुळे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी आपल्या पक्षाच्या आमदाराच्या या कृत्याबाबत अजूनही चकार शब्द उच्चारलेला नाही. माझ्या तक्रारीबाबत पोलिसांनी कायद्यानुसार कारवाई करावी, एवढेच माझे म्हणणे आहे, असेही श्रीमती रशीद यांनी नमूद केले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in